# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

# प्रथम वर्ष कला

# अभ्यासक्रम-द्वितीय सत्र

# राज्यशास्त्र- जून २०१३

**(सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)**

# सामान्य पेपर-भारतीय संविधान

# (Indian Constitution)

**राज्यशास्त्र जनरल-२०१- अः भारतीय संविधान**

**द्वितीय सत्र अभ्यासक्रम**

| | |
|---|---|
| **१. कार्यकारी मंडळ-** | केंद्रीय व राज्य कार्यकारी मंडळ- रचना, अधिकार आणि कार्य |
| **२. कायदे मंडळ-** | केंद्रीय व राज्य कायदे मंडळ- रचना, अधिकार आणि कार्य, भारतातील कायदानिर्मितीची प्रक्रिया |
| **३. न्याय मंडळ-** | सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय- रचना,अधिकार,आणि कार्य, न्यायालयीन सक्रियता, जनहितांर्थ याचिका, लोकपाल |
| **४. भारतातील नागरी सेवा-** | नागरी सेवांचे महत्व, सेवक भरती पद्धती<br>केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोग- रचना, अधिकार आणि कार्य<br>कर्मचारी निवड मंडळ- अधिकार आणि कार्य |

## प्रकरण १ ले
## कार्यकारी मंडळ

**प्र.१ ला. राष्ट्रपतीपदाचे महत्त्व सांगुन राष्ट्रपतीचे अधिकार व कार्याबद्दल चर्चा करा?**

भारताने संसदिय शासनपद्धतीचा अवलंब केलेला आहे.या शासनपद्धतीत वास्तव आणि नामधारी असे दोन प्रमुख असतात.राष्ट्रपती हा देशाचा सर्वोच्च प्रमुख असून सर्व राज्यकारभार त्यांच्या नावाने चालत असतो.तो लष्कराच्या तिन्ही दलाचा सरसेनापती असतो.सर्व राज्यकारभार त्यांच्या नावाने चालत असला तरी तो नामधारी प्रमुख असतो.वास्तव सत्ता पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या हातात असते.राष्ट्रपती त्यांच्या सल्लाने राज्यकारभार करतो.

**पात्रता -** राष्ट्रपतीची निवडणुक लढविण्यासाठी पुढिल पात्रता घटनेत नमूद केलेल्या आहेत.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) त्यांचे वयाची ३५ वर्ष पूर्ण केली पाहिजे.
३) लोकसभा सभासद म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.
४) तो सरकारी नोकर किंवा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा.

**कार्यकाल -** राष्ट्रपतीचा कार्यकाल घटनेनुसार ५ वर्ष इतका आहे.कार्यकाल पूर्ण होण्याआधी तो स्वत:हून राजिनामा देऊ शकतो.मृत्यू व इतर कारणाने पद रिक्त झाल्यास सहा महिन्याच्या आत राष्ट्रपती पदाची निवडणूक घेतली जाते.

**बडतर्फी -** राष्ट्रपतीला महाभियोग पद्धतीने पदावरून दूर करता येते.त्याने घटनाभंग, भष्ट्राचार व गैरवर्तन केल्यास संसदेच्या कोणत्याही सभागृहातील १/४ सदस्यांनी १४ दिवस आधी राष्ट्रपतीला नोटिस द्यावी लागते.त्यानंतर हा प्रस्ताव लोकसभेत मांडला जातो. लोकसभेने आरोपपत्र २/३ बहुमताने मंजूर केल्यानंतर ते राज्यसभेत जाते.राज्यसभेत आरोपपत्राची छाननी होते.या गृहात स्वत: किंवा वकिल लावून आपली बाजू मांडता येते.राज्यसभेने २/३ बहुमताने मंजुरी दिल्यास महाभियोग प्रक्रिया पूर्ण होते.राष्ट्रपतीला आपल्या पदाचा राजिनामा द्यावा लागतो.

**वेतन -** राष्टपतीला मासिक दीड लाख रुपये वेतन मिळते.वेतनासोबत आरोग्य भत्ता, सरकारी निवासस्थान, प्रवास भत्ता व इतर भत्ते मिळतात.निवृत्तीनंतर मूळ वेतनाच्या निम्मे रक्कम निवृत्ती वेतन मिळते.

**राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य -** घटनेने राष्ट्रपतीला व्यापक अधिकार दिलेले आहे.ते पुढीलप्रमाणे

**१) कार्यकारी अधिकार -** संघराज्याचा प्रमुख या नात्याने राष्ट्रपती भारताचा प्रथम नागरिक असतो.सर्व राज्यकारभार त्यांच्या नावाने चालतो.पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्लानुसार तो राज्यकारभार करतो.पंतप्रधानाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असतो. लोकसभेत बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला तो पंतप्रधान पदी नेमतो.पंतप्रधानच्या सल्लाने इतर मंत्र्यांची नेमणूक करतो. लोकसभेत कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्यास बहुमत मिळू शकणाऱ्या नेत्यांची नेमणूक पंतप्रधान पदी करतो.याशिवाय सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्यपाल,राजदूत, महालेखापाल, निवडणुक आयुक्त, विविध आयोगाचे अध्यक्ष व सदस्य इ.च्या नेमणूका राष्ट्रपती करतो.याशिवाय युद्ध घोषित करणे, आंतरराष्ट्रीय तह वा करार करणे, परराष्ट्रातील राजदुताची ओळखपत्रे स्वीकारणे, आंतरराष्ट्रीय परिषदेत देशाचे नेतृत्व करणे इ.कार्य राष्ट्रपती करतो.

**२) कायदेविषयक कार्य -** राष्ट्रपतीला संसदेचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार आहे.मात्र दोन अधिवेशना दरम्यान १८० दिवसापेक्षा जास्त अंतर असू नये हे घटनात्मक बंधन आहे.संसदेचे अधिवेशन बोलविणे, त्याचा कालावधी ठरविणे, ते स्थगित करणे तसेच दरवर्षी पहिल्या अधिवेशनात किंवा निवडणुकीनंतरच्या अधिवेशनात अभिभाषण करण्याचा अधिकार आहे.संसदेने दोन्ही सभागृहानी मंजूर केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतीची मंजुरी शिवाय विधयेकाचे कायदयात रूपांतर होत नाही.तो विधेयक एकदा फेटाळू शकतो.परंतु तेच विधेयक संसदेने पुन्हा मंजूर केल्यास राष्ट्रपतीला स्वाक्षरी ही करावीच लागते.संसदेच्या विश्रांती काळात वटहुकूम काढण्याचा अधिकार त्याला आहे.वटहुकूमाचा दर्जा कायदयाप्रमाणे असतो.संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर सहा आठवडयांच्या आत त्याला संसदेची मान्यता मिळणे आवश्यक असते.अन्यथा वटहुकूम रद्द होतो.राज्यसभेत कला, साहित्य, विज्ञान व समाजसेवा क्षेत्रातील १२ नामांकित व्यक्तीची सदस्य म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला

आहे.लोकसभेत ॲग्लो इंडियन समाजाला प्रतिनिधित्व न मिळाल्यास त्या समाजाचे दोन सदस्य नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

**३) आर्थिक अधिकार** -राष्ट्रपतीच्या पूर्व परवानगी शिवाय अर्थ विधयेक वा अंदाजपत्रक संसदेत मांडता येत नाही.तसेच केंद्र-राज्य उत्पन्न वाटणीसाठी वित्त आयोग नेमण्याचा अधिकार त्याला आहे.याशिवाय पूरक अनुदान, सहाय्यक अनुदान, लेखाअनुदान व कर्ज इ.साठी त्यांची संमती आवश्यक असते.देशातील संचित व आकस्मित निधीतून राष्ट्रपतीच्या संमतीने खर्च करता येतो.

**४) न्यायविषयक अधिकार -** सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधिशाचा नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमतांना सरन्यायाधीशाचा सल्ला घेतो.तर उच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमतांना सरन्यायाधीश व संबधित राज्याचा मुख्य न्यायाधीश व राज्यपाल यांचा सल्ला घेतो.संघराज्याचा प्रमुख या नात्याने दया दाखविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. या अधिकारातंर्गत संघ कायदयानुसार शिक्षा झालेल्या गुन्हेगाराची शिक्षा पूर्णपणे माफ करणे, शिक्षा स्थगित करणे, शिक्षेचे स्वरूप बदलणे इ.अधिकार त्याला आहेत.

**५) आणीबाणीचे अधिकार-** घटनेनुसार राष्ट्रपतीला तीन प्रकारची आणीबाणी जाहीर करता येते.

**अ) राष्ट्रीय आणीबाणी -** घटनेच्या ३५२ व्या कलमानुसार युद्ध, परकीय आक्रमण आणि सशस्त्र उठाव इ.कारणासाठी राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करू शकतो.

**ब) राज्य आणीबाणी -** एखादया राज्यात घटनात्मकरीत्या राज्यकारभार चालविणे अशक्य आहे असा अहवाल राज्यपालाने राष्ट्रपतीकडे पाठविल्यास आणि त्याची खात्री झाल्यास राष्ट्रपती घटनेच्या ३५६ व्या कलमानुसार राज्य आणीबाणीची घोषणा करू शकतो.राज्य आणीबाणी काळात मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ आणि विधीमंडळ बरखास्त होते.

**क) आर्थिक आणीबाणी -** देश आर्थिकदृष्टया दिवाळखोर झाल्यास किंवा गंभीर आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाल्यास राष्ट्रपती घटनेच्या ३६० व्या कलमानुसार आर्थिक आणीबाणी घोषित करतो.या काळात राज्याना केंद्राच्या आदेशाप्रमाणे कार्य करावे लागते.या आणीबाणीत न्यायाधीश व सरकारी अधिकाऱ्यांच्या वेतनात कपात करता येते.

वरील आणीबाणी जाहिर करण्याचा अधिकार असला तरी आणीबाणी घोषित केल्यानंतर एका महिन्याच्या आत संसदेची मान्यता आवश्यक असते, अन्यथा आणीबाणी रद्द होते.

**राष्ट्रपतीच्या निवडणूकीचे स्वरूप -** भारताच्या राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्षपणे म्हणजे जनतेने निवडुन दिलेल्या प्रतिनिधी मार्फत होते.राष्ट्रपती हा संपूर्ण देशाचा प्रमुख असल्याने त्यांच्या निवड प्रक्रियेत केंद्र व घटकराज्य कायदेमंडळातील प्रतिनिधीचा समावेश केला जातो.राष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी एक निर्वाचन मंडळ निर्माण केले जाते.त्यात पुढील सदस्याचा समावेश असतो.

१) लोकसभा निर्वाचित सदस्य

२) राज्यसभा निर्वाचित सदस्य

३) राज्यविधानसभेतील निर्वाचित सदस्य

वरील सदस्यांना मतदानाचा अधिकार असतो.राष्ट्रपतीच्या निवडीसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्व किंवा एकल संक्रमणीय मतदान पद्धतीचा वापर केला जातो.राष्ट्रपती निवडणुकीत मतदान करणाऱ्या संसद आणि विधानसभा सदस्यांचे मतमूल्य सारखे नसते.मतमूल्य ठरविण्यासाठी घटनेत पुढील सूत्र दिलेले आहे.

राज्य विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य ठरविणारे सुत्र -

$$\frac{\text{राज्याची लोकसंख्या}}{\text{विधानसभेच्या निर्वाचित सदस्य संख्या}} \times \frac{१}{१०००}$$

वरिल सुत्राचा वापर करून विधानसभा सदस्य मतमूल्य काढले जाते.तसेच पुढील सुत्राचा वापर करून संसद सदस्याचा मत मूल्य काढले जाते.

-

विधानसभाच्या निर्वाचित सर्व सदस्यांना प्राप्त झालेली एकुण मते
संसद सदस्यांच्या मताचे मूल्य ठरविणारे सुत्र ---------------------------------------------------------
लोकसभा व राज्यसभा यातील निर्वाचित सदस्यांची संख्या

राष्ट्रपती निवडणूकीसाठी क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो.ही मतदान पद्धती साध्या मतदान पद्धतीपेक्षा वेगळी आहे.या पद्धतीत मतपत्रिकेवर उमेदवारांची नांवे दिलेली असतात.उमेदवाराच्या नांवासमोर पसंतीक्रमांक टाकावे लागतात.निवडणुकीत जितके उमेदवार उभे असतील तितके पंसतीक्रमांक दयावे लागतात.या पद्धतीत निवडुन येणाऱ्या उमेदवाराला विशिष्ट मतांचा कोटा पूर्ण करावा लागतो.राष्ट्रपती निवडणुकीसाठी मतसंख्येचा कोटा पुढिल सुत्राच्या आधारे निश्चित केला जातो.

राष्ट्रपती निवडणुकीत झालेले एकुण वैध मतदान
राष्टपती निवडणूक कोटा ------------------------------------------------- = १
निवडून द्यावयाच्या प्रतिनिधी संख्या +१

कोटा निश्चित केल्यानंतर मतमोजणीस सुरूवात होते.सर्वप्रथम पहिल्या पंसतीची मते मोजली जातात.उमेदवाराने कोटा पूर्ण केल्यास त्याला विजयी घोषित केले जाते.पण कोटा पूर्ण न केल्यास पहिल्या पंसतीची सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवारास निवडणुकीतून बाद केले जाते.त्याच्या दुसऱ्या पंसतीची मते मोजली जातात.त्यानेही कोटा पूर्ण न झाल्यास दुसऱ्या पंसतीची मते मोजली जातात.अशा पद्धतीने कोटापूर्ण होत नाही तोपर्यंत मत मोजणी सुरू राहते.प्रत्येक फेरीत सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद केले जाते.त्यांच्या पुढच्या पंसतीची मते मोजली जातात.अशा पद्धतीने जोपर्यंत उमेदवाराला बहुमत मिळत नाही तोपर्यत उमेदवाराला विजयी घोषित केले जात नाही.

**उपराष्ट्रपती -**

संसदीय लोकशाही देशात उपराष्ट्रपती पद अस्तित्वात नाही.मात्र भारतात या पदाची निर्मिती केलेली आहे.कारण राष्ट्रपती पद हे कोणत्याही कारणाने (राजीनामा, मृत्यू व महाभियोग) रिक्त झाल्यास हे पद सांभाळण्यासाठी जबाबदार व्यक्ती असावी.म्हणून उपराष्ट्रपती पदाची निर्मिती केलेली आहे.

**पात्रता -** उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढवियासाठी पुढील पात्रता सांगितली जाते.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) त्याने वयाची ३५ वर्ष वय पूर्ण केले पाहिजे.
३) राज्यसभेचा सभासद म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.
४) सरकारी नोकर वा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा.

**कार्यकाल व बडतर्फी -** उपराष्ट्रपती पदाचा कार्यकाल घटनेनुसार ५ वर्षाचा इतका आहे.कार्यकाल पूर्ण करण्याआधी तो राजीनामा देऊ शकतो.घटनाभंगाच्या कारणावरून संसदेच्या दोन्ही गृहानी बहुमतानी ठराव मंजूर केल्यास त्यांना राजिनामा दयावा लागतो.मात्र त्याबाबत राज्यसभेला पुढाकार ध्यावा लागतो.

**निवडणूक पद्धती -** उपराष्ट्रतीची निवडणुक अप्रत्यक्ष पद्धतीने होते.निवडणुकीत क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो.लोकसभा आणि राज्यसभातील निर्वाचित सदस्यांद्वारे उपराष्ट्रपती निवडला जातो.

**अधिकार व कार्य -** उपराष्ट्रपतीला दोन प्रकारची कामे करावी लागतात.

अ) राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत तो तात्पुरता राष्ट्रपती म्हणून काम करत असतो.मृत्यू वा कोणत्याही कारणाने राष्ट्रपती पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती हंगामी राष्ट्रपती म्हणून काम करतो.नवीन राष्ट्रपती निवडून येईपर्यत काम पाहतो.या काळात राष्ट्रपतीचे सर्व अधिकार व सवलती त्याला मिळतात.

ब) उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो.त्याला वेतन देखील राज्यसभेचा सभापती या नात्याने मिळते.सभापती म्हणून त्यांला पुढील कामे करावी लागतात.

१) राज्यसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविणे.
२) सभागृहात शांतता व शिस्त टिकविणे. बेशिस्त वर्तन करणांऱ्या सभासदाला निलंबित करणे. सभागृहात गोंधळामुळे गृहाचे कामकाज चालविणे अशक्य झाल्यास कामकाज स्थगित करणे.
३) सभापतीला मतदानाचा अधिकार नाही.मात्र एखादया विधयेकावर समान मते पडल्यास तो निर्णायक मत देऊ शकतो.
४) सदस्यांना विधेयक मांडण्याची प्रश्न विचारण्याची परवानगी देणे, विधेयक मांडण्याची परवानगी देणे, विधेयकावर चर्चा घडवुन आणणे, विधयेकावर मतदान घेणे आणि विधेयक मंजूर झाल्यास दुसऱ्या सभागृहाला ते पाठविणे.

**प्र.२रा.पंतप्रधान पदाचे महत्त्व सांगुन पंतप्रधानाचे अधिकार व कार्य सांगा?**

**किंवा**

**पंतप्रधान हा ग्रहमालेतील सूर्य आहे या विधानाची चर्चा सांगा?**

भारताने संसदिय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे.त्यामुळे राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख असतो.पंतप्रधान हा वास्तव प्रमुख असतो.या पदाचे वर्णन समानातील पहिला वा ग्रहमालेतील सूर्य असे केले जाते.पंतप्रधान नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीना आहे.पण हा अधिकार औपचारिक आहे. लोकसभेत ज्या पदाला बहुमत असेल त्या पक्षाच्या नेत्यांला पंतप्रधान नेमले जाते.कोणत्याही पक्षाला बहुमत नसेल तर बहुमत प्राप्त करू शकणाऱ्या नेत्याची पंतप्रधानपदी राष्ट्रपती नेमणूक करतो.

**कार्यकाल -** पंतप्रधानाचा कार्यकाल घटनेनुसार ५ वर्ष इतका असतो.पण प्रत्यक्षात त्यांचा कार्यकाल अनिश्चित असतो.कारण जोपर्यंत लोकसभेचा विश्वास आहे तोपर्यंत पदावर राहता येते.लोकसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास त्याला राजिनामा द्यावा लागतो.

**पंतप्रधानाचे अधिकार व कार्य -** देशाचा सर्वोच्च प्रमुख नात्याने पंतप्रधानाला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

**१) मंत्रीमंडळाची निर्मिती करणे -** मंत्री मंडळाची निर्मिती करणे हे पंतप्रधानाचे अत्यंत महत्त्वाचे कार्य असते.पंतप्रधानाच्या सल्लानुसार राष्ट्रपती मंत्र्याची नेमणूक करतो.मंत्रीमंडळात कोणाला घ्यावे, कोणाला वगळावे, किती मंत्री घ्यावेत या बाबतचा निर्णय पंतप्रधानाला करावा लागतो.मंत्रीमंडळ तयार करण्याचा अधिकार पंतप्रधानाला असला तरी त्याला अनेक गोष्टीचा विचार करावा लागतो.पक्षातील ज्येष्ठ नेते, पक्षातील विविध गट, अल्पसंख्याक, स्त्रिया, मागासलेल्या जाती व प्रांत इ.चा विचार करून मंत्रिमंडळ तयार करावे लागते.त्यामुळे मंत्रिमंडळ तयार करणे तारेवरची कसरत असते.

**२) खातेवाटपाचे कार्य -** मंत्रिमंडळाच्या निर्मिती नंतर खाते वाटपाचे कार्य पंतप्रधानाला करावे लागते.खातेवाटप करतांना मंत्र्यांचा पक्षातील दर्जा, त्यांची योग्यता व वैयक्तिक आवड आणि ज्ञान इ. चा विचार करावा लागतो. शासनाचा कारभार कार्यक्षमपणे चालविण्यासाठी योग्य व्यक्तीकडे योग्य खाते दयावे लागते.

**३) मंत्रीमंडळाचा नेता -** पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा नेता असतो.त्यांच्या अध्यक्षेखाली मंत्रिमंडळाच्या बैठकी त्यांच्या निवासस्थानी होतात.बैठक केव्हा बोलवावी, बैठकीत कोणते विषय चर्चासाठी ठेवावे हे तोच ठरवत असतो.बैठकीत पंतप्रधानाने मांडलेले मत महत्त्वाचे मानले जाते.इतर मंत्री सुद्धा त्यांच्या मताचा आदर करतात.एखादया मंत्र्याचे पंतप्रधानाशी मतभेद झाल्यास त्या मंत्र्याने राजिनामा द्यावा हा संकेत आहे.अन्यथा पंतप्रधान त्या मंत्र्याला राजिनामा देण्यास भाग पाडू शकतो.किंवा त्यांला पदावरून दूर करू शकतो.पंतप्रधानाचा राजिनामा म्हणजे संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा मानला जातो.

**४) राष्ट्रपती आणि संसद दुवा वा मध्यस्थ -** राष्ट्रपती हा संसदेचा एक भाग असतो.तो वर्षातून एकदा अभिभाषणाच्या वेळेस संसदेत जातो.मात्र राष्ट्राचा प्रमुख म्हणून संसदेत चालणाऱ्या कामकाजाची माहिती घेण्याचा त्याला अधिकार आहे.ती सर्व माहिती पंतप्रधान राष्ट्रपतीला देतो.तसेच राष्ट्रपतीची इच्छा व आकांक्षा पंतप्रधान संसदेत मांडण्याचे कार्य करतो.त्यामुळे तो राष्ट्रपती आणि संसद यांना जोडणारा दुवा असतो.

**५) राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यातील दुवा -** मंत्रिमंडळातील कोणताही मंत्री शासकिय कामकाजाबाबत राष्ट्रपतीची वैयक्तिक भेट घेऊ शकत नाही.मंत्राला राष्ट्रपतीची भेट वा सल्ला हवा असल्यास तो पंतप्रधानामार्फत मिळतो.तसेच मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती पंतप्रधान राष्ट्रपतीला कळवितो.राष्ट्रपती त्यांच्याकडून कोणतीही प्रशासकीय माहिती मागवू शकतो.

**६) लोकसभेचा नेता-** पंतप्रधान हा लोकसभेतील बहुमत प्राप्त पक्षाचा नेता असतो.त्यांच्या मार्गदर्शनाखाली सत्तारूढ पक्षाचे सदस्य संसदेत कार्य करित असतात.पक्षाची प्रतिष्ठा व प्रभाव पंतप्रधानाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असतो.तो लोकसभेचा नेता असल्याकारणाने संसदेत शासकिय ध्येय धोरणाचा त्याला पाठपुरावा करावा लागतो.सर्व प्रशासकीय विभागाची माहिती त्यांना ठेवावी लागते.तो संसदेत मंत्रिमंडळाचा नेतृत्व करतो.

**७) राष्ट्राचा व जनतेचा नेता -** पंतप्रधान हा खऱ्या अर्थाने जनतेचा नेता असतो.भारतात निवडणुका पंतप्रधानाच्या नावाने लढविल्या जातात.जनता मतदान करतांना पंतप्रधान पदाचा उमेदवार कोण आहे याचा विचार करून मतदान करतात.त्यामुळे पंतप्रधान जनतेच्या इच्छा आंकाक्षा लक्षात घेऊन जनहित साध्य करण्याचा प्रयत्न करतो.राष्ट्राचा नेता म्हणून आंतरराष्ट्रीय परिषदेत देशाचे नेतृत्व करतो.परराष्ट्र मंत्री स्वतंत्र असला तरी पंतप्रधान हा परराष्ट्रधोरणाचा मुख्य शिल्पकार असतो.

**८) नेमणूकीचे अधिकार -**वरिल कार्याशिवाय सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीश, निवडणुक आयुक्त, महालेखापाल, राज्यपाल, राजदूत, विविध आयोगाचे अध्यक्ष व सदस्य इ.च्या नेमणुका करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असला तरी त्या नेमणुका पंतप्रधानाच्या शिफारसीनुसार होतात.याशिवाय राष्ट्रपतील जे आणीबाणीचे अधिकार असले तरी पंतप्रधानाच्या सल्लाने तो आणीबाणी जाहिर करतो.

**प्र.३ रा केंद्रीय मंत्रिमडळाची रचना, कार्य व अधिकार सांगा.**

भारतात संसदीय शासन पद्धतीचा अंवलब केलेला असल्यामुळे राष्ट्रपती नामधारी प्रमुख असुन पंतप्रधान व मंत्रिमंडळ वास्तव सत्ताधीश आहे.घटनेनुसार पंतप्रधान व मंत्रिमंडळ नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असला तरी हा अधिकार औपचारिक आहे.लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्रपती पंतप्रधान पदी नेमतो.पंतप्रधानाच्या सल्लाने तो इतर मंत्र्यांची नेमणूक करतो.मंत्रीमंडळात किती मंत्री घ्यावे,कोणाला मंत्री बनवावे याबाबतचा निर्णय पंतप्रधानाचा असतो.मंत्रिमडळात साधारणतः तीन प्रकारचे मंत्री असतात.१) कॅबिनेट मंत्री २) राज्यमंत्री ३) उपमंत्री याशिवाय बिनखात्याचे मंत्री व संसदीय सचिव हे आधुनिक काळात नव्याने उदयाला आलेले प्रकार आहेत.

**कामकाज पद्धती -** मंत्रिमंडळाचे काम विविध खात्यामार्फत चालते.मंत्र्यामध्ये खातेवाटप पंतप्रधान करत असतो.संसदीय शासन पद्धतीत मंत्रिमंडळ सामुहिक जबाबदारीच्या तत्त्वांवर कार्य करत असते.सर्व मंत्री सामुहिकरित्या लोकसभेला जबाबदार असतात.लोकसभेचा विश्वास असेपर्यंत पदावर राहतात.लोकसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास मंत्रिमंडळाला पदाचा राजिनामा द्यावा लागतो.

**मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्य-**

घटनेत मंत्रिमंडळाच्या कार्याचा उल्लेख नाही.राष्ट्रपतीला जे अधिकार दिले आहेत.त्यांचा प्रत्यक्षात वापर ते करीत असतात.मंत्रिमंडळाला पुढील कार्य करावी लागतात.

**१) धोरण निश्चित करणे -** प्रत्येक पक्ष निवडणुकीच्या काळात जनतेला आश्वासने देत असतो.सत्तेवर आल्यानंतर आश्वासनाचे रूपांतर धोरणात करावे लागते.जनतेच प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक खात्याच्या कार्यासंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय सर्व संमतीने घेतले जातात.त्यानंतर ते धोरण संसदेकडून मंजूर करून घेणे हे मंत्रिमंडळाचे पूरक कार्य असते.

**२) कायदेविषयक कार्य-** मंत्रिमंडळाचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्याला पाहिजे ते कायदे संसदेकडून करून घेणे.संसदेच्या बैठकीत भाग घेण्याचा आणि मांडण्याचा अधिकार मंत्र्यांना असतो.जास्तीत जास्त विधेयके मंत्र्याकडून मांडली जातात.त्याना सरकारी विधेयक असे म्हणतात.मंत्रिमंडळाच्या पाठिशी बहुमत असल्यामुळे मंत्र्याने मांडलेले

विधेयक सहज मंजूर होते.संसदेचे अधिवेशन केव्हा बोलवावे, स्थगित करावे.हा अधिकार राष्ट्रपतीला असला तरी तो मंत्रिमंडळाच्या सल्लाने निर्णय घेतो.

**३) राज्यकारभार चालविणे -** संपूर्ण देशाच्या प्रशासनाची जबाबदारी मंत्रिमंडळाकडे असते.प्रत्येक मंत्री आपल्या खात्याचे कार्य सांभाळतो.मंत्रिमंडळाने निश्चित केलेल्या धोरणानुसार निर्णय घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी मंत्रिमंडळाला करावी लागते.निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सनदी अधिकाऱ्याची मदत घेतली जाते.प्रशासकिय अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते.कायदेमंडळाने केलेले कायदे आणि न्यायालयाने दिलेले निर्णय यांची अंमलबजावणी मंत्रिमंडळाला करावी लागते.या कार्यावर मंत्रिमंडळाचे यश अंवलबून असते.

**४) समन्वयात्मक कार्य -** भारताचा भूप्रदेश प्रचंड मोठा असल्याने प्रशासनाचे मोठया प्रमाणावर विकेंद्रीकरण झालेले आहे.विकेंद्रीकरणामुळे एका खात्याचे कार्य दुसऱ्या खात्याच्या कार्याला घातक ठरू नये याची दक्षता मंत्रिमंडळाला घ्यावी लागते.शासनाच्या दोन खात्यांनी परस्परविरोधी नियम केल्यास मंत्रिमंडळाच्या धोरणाला धोका पोहचतो.म्हणून विविध खात्यामध्ये समन्वय प्रस्तापित करण्यासाठी आंतरमंत्रिमंडळ समित्या निर्माण केलेल्या असतात.धोरणात्मक बाबतीत दोन खात्यात वाद निर्माण झाल्यास पंतप्रधानाच्या मध्यस्थीने त्या वादाचे निराकरण केले जाते.मंत्रिमंडळात समन्वय निर्माण करण्याचे कार्य पंतप्रधानाला करावे लागते.

**५) आर्थिक कार्य -** घटनेने राष्ट्रपतीला जे आर्थिक अधिकार दिलेले आहेत त्यांचा वापर मंत्रिमंडळ करीत असते.अंदाजपत्रक तयार करणे अर्थमंत्र्याचे काम असते.अंदाजपत्रक तयार करण्याआधी अर्थमंत्री विविध खात्यातून येणाऱ्या मागण्यांचा विचार करून अंदाजपत्रक तयार करतो.त्या अंदाजपत्रकावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर ते संसदेत मांडले जाते.संसदेची मान्यता मिळाल्यानंतर मंत्रिमंडळाला प्रशासकिय खर्च करता येतो.

**६) इतर कार्य -** वरिल कार्याशिवाय राष्ट्रपतीच्या वटहुकूमांचा मसुदा मंत्रिमंडळ तयार करत असते.राष्ट्रपतीचे अभिभाषण तयार करणे हे मंत्रिमंडळाचे काम असते.याशिवाय आणीबाणी जाहिर करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे, परराष्ट्राशी तह, करार करणे इ.अधिकार राष्ट्रपतीला असले तरी त्यांचा प्रत्यक्षात वापर मंत्रिमंडळ करत असते.

वरील कार्याचा विचार केल्यास मंत्रिमंडळाकडे व्यापक जबाबदाऱ्या असल्याचे दिसून येते.

**प्र.४ रा राज्यपाल पदाचे महत्त्व सांगुन त्यांचे अधिकार व कार्य सांगा.**

भारतात संघराज्यपद्धती असल्यामुळे केंद्राप्रमाणे घटकराज्य प्रशासनाचा आकृतीबंध दिसून येतो.ज्याप्रमाणे राष्ट्रपती हा देशाचा घटनात्मक प्रमुख असतो.त्याचप्रमाणे राज्यपाल हा घटकराज्याचा घटनात्मक प्रमुख असतो.प्रत्येक राज्यात राज्यपाल पद अस्तित्वात आहे.एक किंवा दोन घटकराज्यांसाठी एक राज्यपाल नेमला जातो.त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.राज्यपाल नेमतांना संबंधित राज्याचा मुख्यमंत्र्याचा सल्ला घ्यावा हा संकेत आहे.राज्यपाल पदावर साधारणत:निवृत्त लष्करी व सनदी अधिकारी आणि ज्येष्ठ नेत्यांची निवड केली जाते.

**पात्रता -** राज्यपाल पदासाठी पुढील पात्रता घटनेत दिलेल्या आहेत.

१) तो भारतीय नागरिक असावा.

२) त्याने वयाची ३५ वर्ष पूर्ण केली पाहिजे.

३) तो सरकारी नोकर किंवा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणार नसावा.

४) विधानसभा किंवा संसदेचा सदस्य नसावा.

**वेतन व कार्यकाल -** घटनेनुसार राज्यपालाला ५ वर्ष पदावर राहता येते.मात्र प्रत्यक्षात राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत तो पदावर राहू शकतो.राष्ट्रपती राज्यपालला केव्हाही राजीनामा देण्यास भाग पाडू शकतो.राज्यपालला एक लाख रुपये आणि दहा हजार रुपये इतके मासिक असते.याशिवाय सरकारी निवासस्थान, वाहन भत्ता, आरोग्य भत्ता व निवृत्ती वेतन इ.सोयी व सवलती मिळतात.

**अधिकार व कार्य** - घटनेने राज्यपालांना पुढील अधिकार दिलेले आहेत.

१) **कार्यकारी अधिकार** - राज्यपाल हा घटकराज्याचा कार्यकारी प्रमुख असल्याने संपूर्ण राज्यकारभार त्यांच्या नावाने चालतो.मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्लाने तो राज्यकारभार करत असतो.मुख्यमंत्र्याची नेमणूक करण्याचा अधिकार त्यांना असला तरी हा अधिकार औपचारिक आहे.विधानसभेत बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला मुख्यमंत्री नेमावे लागते.मुख्यमंत्र्याच्या सल्लाने तो इतर मंत्र्याची नेमणूक करतो.याशिवाय उच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमताना राष्ट्रपती त्यांचा सल्ला घेतो.राज्याचा महाधिवक्ता, निवडणुक आयुक्त, लोकसेवा अध्यक्ष व सदस्य, राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायाधीश जिल्हाधिकारी व आय.एस.एस.अधिकाऱ्यांची नेमणुका राज्यपाल करत असतो.

२) **कायदेविषयक अधिकार** - राज्यपालाला विधीमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार आहे.मात्र दोन अधिवेशना दरम्यान १८० दिवसापेक्षा जास्त अंतर असू नये हे घटनात्मक बंधन आहे.विधिमंडळाचे अधिवेशन बोलविणे,त्याचा कालावधी ठरविणे आणि स्थगित करणे हे अधिकार त्यांना आहेत.तसेच दरवर्षी पहिल्या अधिवेशनात किंवा निवडणुकीनंतरच्या प्रथम अधिवेशनात अभिभाषण करण्याचा अधिकार त्यांला आहे. विधीमंडळाचे दोन्ही सभागृहानी मंजूर केलेल्या विधेयकावर राज्यपालाची मंजुरी मिळत नाही.तोपर्यंत विधयेकाचे कायदयात रूपांतर होत नाही.तो विधेयक एकदा फेटाळू शकतो.परंतु तेच विधेयक विधिमंडळाने पुन्हा मंजूर केल्यास राज्यपालाला सहीही करावीच लागते.तो काही विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवू शकतो.विधिमंडळ विश्रांती काळात वटहुकूम काढण्याचा अधिकार त्याला आहे.वटहुकूमाचा दर्जा कायदयाप्रमाणे असतो.विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर सहा आठवडयांच्या आत विधिमंडळाची मान्यता मिळणे आवश्यक असते.अन्यथा वटहुकूम रद्द होतो.विधानपरिषदेत कला, साहित्य, विज्ञान व समाजसेवा क्षेत्रातील नामांकित व्यक्तींची सदस्य म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार राज्यपालांना आहे .विधानसभेत ॲंग्लो इंडियन समाजाला योग्य प्रतिनिधित्व न मिळाल्यास त्या समाजाचा एक प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार त्यांनाआहे.

३) **आर्थिक अधिकार** - राज्यपालाच्या परवानगीशिवाय आर्थिक विधेयक विधानसभेत मांडता येत नाही.वार्षिक अंदाजपत्रक मांडण्याआधी त्यांची परवानगी घ्यावी लागते.अनुदानाच्या मागणीवर राज्यपालाची शिफारस आवश्यक असते.राज्याची संचित व आकस्मित निधीवर त्यांचे नियंत्रण असते.अचानक उद्‌भवलेला खर्च भागविण्यासाठी राज्यपालाच्या नियंत्रणाखाली आकस्मित निधी असतो.त्या निधीतील पैसा त्यांच्या संमतीने खर्च करता येतो.

४) **न्यायविषयक अधिकार** - उच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमतांना राष्ट्रपती राज्यपालाचा सल्ला घेतो.राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशाच्या नेमणुका, बडतर्फी व बदल्या करण्याचा अधिकार त्याला आहे.राज्याच्या कार्यकारी क्षेत्रात आणि राज्य कायदयानुसार शिक्षा झालेल्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करण्याचा वा माफ करण्याचा किंवा शिक्षेस स्थगिती देण्याचा अधिकार त्यांना आहे.

५) **इतर अधिकार** - वरील अधिकाराशिवाय राज्यातील विविध आयोगाचे अहवाल मागवण्याचा आणि तो अहवाल विधीमंडळात ठेवण्याचा अधिकार त्याला आहे.राज्यपाल हा राज्यातील सर्व विद्यापीठाचा कुलपती असतो. घटनात्मकदृष्टया सरकार चालवणे अशक्य असेल तर तसा अहवाल राष्ट्रपतीकडे पाठवतो.राष्ट्रपतीची खात्री झाल्यास राष्ट्रपती त्या राज्यासाठी आणीबाणी जाहिर करतो.त्या तो राष्ट्रपतीचा हस्तक म्हणून वास्तव सत्ताधीश बनतो.मुख्यमंत्र्याच्या सल्लाने तो विधानसभा बरखास्त करू शकतो.

**प्र.५ वा मुख्यमंत्री पदाचे महत्त्व सांगुन त्याचे अधिकार व कार्य स्पष्ट करा?**

घटनेच्या १६२ व्या कलमानुसार राज्यपालाना मदत व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ राहिल ही तरतूद आहे.मुख्यमंत्री नेमण्याचा अधिकार त्यांना आहे.मात्र हा अधिकार औपचारिक आहे.कारण विधानसभेत बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून नेमतो.कोणत्याही पक्षास बहुमत नसेल तर बहुमत प्राप्त करू शकणाऱ्या नेत्यांची राज्यपाल आपल्या मर्जीने मुख्यमंत्री पदी नेमणुक करू शकतो.मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असून जापर्यंत विधानसभेचा विश्वास आहे

तोपर्यंत पदावर राहता येते.विधानसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाला राजिनामा दयावा लागतो.त्यामुळे मुख्यमंत्र्याचा कार्यकाल अनिश्चित मानला जातो.

**अधिकार व कार्य -** केंद्रात जे स्थान पंतप्रधानाला आहे ते स्थान मुख्यमंत्र्याला राज्यात असते.त्याला पुढील कार्य करावी लागतात.

**१)मंत्रीमंडळाची निर्मिती करणे -**मंत्रिमंडळाची निर्मिती करणे हे मुख्यमंत्र्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य असते.मुख्यमंत्र्याच्या सल्लानुसार राज्यपाल मंत्र्याची नेमणूक करतो.मंत्रीमंडळात कोणाला घ्यावे, कोणाला वगळावे, किती मंत्री घ्यावेत या बाबतचा निर्णय त्यांना घ्यावा लागतो.मंत्रिमंडळ तयार करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याला असला तरी त्याला अनेक गोष्टीचा विचार करावा लागतो.पक्षातील ज्येष्ठ नेते, पक्षातील विविध गट, अल्पसंख्याक, स्त्रिया, मागासलेल्या जाती व विविध प्रदेश इ.चा विचार करून मंत्रिमंडळ तयार करावे लागते.त्यामुळे मंत्रिमंडळ तयार करणे तारेवरची कसरत असते.

**२) खातेवाटपाचे कार्य -** मंत्रिमंडळाच्या निर्मिती नंतर खाते वाटपाचे कार्य मुख्यमंत्र्याला करावे लागते.खातेवाटप करतांना मंत्र्यांचा पक्षातील दर्जा, त्यांची योग्यता व वैयक्तिक आवड आणि ज्ञान इ. चा विचार करावा लागतो शासनाचा कारभार कार्यक्षमपणे चालविण्यासाठी योग्य व्यक्तीकडे योग्य खात्यांची जबाबदारी दयावी लागते.

**३) मंत्रीमंडळाचा नेता -** मुख्यमंत्री हा मंत्रिमंडळाचा नेता असतो.त्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या बैठकी त्यांच्या निवासस्थानी होतात.बैठक केव्हा बोलवावी, बैठकीत कोणते विषय मांडावे याबाबत निर्णय तोच घेत असतो.बैठकीत मुख्यमंत्र्याने मांडलेले मत महत्त्वाचे मानले जाते.इतर मंत्री सुद्धा त्यांच्या मताचा आदर करतात.एखादया मंत्र्याचे मुख्यमंत्र्याशी मतभेद झाल्यास त्या मंत्र्याने राजिनामा द्यावा हा संकेत आहे.अन्यथा मुख्यमंत्री त्या मंत्र्याला राजिनामा देण्यास भाग पाडू शकतो.किंवा त्यांना पदावरून दूर करू शकतो.मुख्यमंत्र्याचा राजिनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजिनामा मानला जातो.

**४) राज्यपाल आणि विधीमंडळ दुवा वा मध्यस्थ -** राज्यपाल हा विधिमंडळाचा एक भाग असतो.तो वर्षातून एकदा अभिभाषणाच्या वेळेस विधिमंडळातजातो.मात्र राज्याचा प्रमुख म्हणून विधिमंडळात चालणाऱ्या कामकाजाची माहिती घेण्याचा त्याला अधिकार आहे.ती सर्व माहिती मुख्यमंत्री राज्यपालाला देतो.तसेच राज्यपालाची इच्छा व आकांक्षा मुख्यमंत्री विधिमंडळात मांडण्याचे कार्य करतो.त्यामुळे तो राज्यपाल आणि विधीमंडळ यातील दुवा वा मध्यस्थ असतो.

**५) राज्यपाल आणि मंत्रीमंडळ यातील दुवा -** मंत्रिमंडळातील कोणताही मंत्री शासकिय कामकाजाबाबत राज्यपालची वैयक्तिक भेट घेऊ शकत नाही.मंत्राला राज्यपालाची भेट वा सल्ला हवा असल्यास तो मुख्यमंत्र्यामार्फत मिळतो.तसेच मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती मुख्यमंत्री राज्यपालास कळवितो. राज्यपाल त्यांच्याकडून कोणतीही प्रशासकीय माहिती मागवू शकतो.

**६) विधानसभेचा नेता-** मुख्यमंत्री हा विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाचा नेता असतो.त्यांच्या मार्गदर्शनाखाली सत्तारूढ पक्षाचे सदस्य विधानसभेत कार्य करीत असतात.पक्षाची प्रतिष्ठा व प्रभाव मुख्यमंत्र्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते.तो विधानसभेचा नेता असल्या कारणाने विधानसभेत शासकिय ध्येय धोरणाचा त्याला पाठपुरावा करावा लागतो.सर्व प्रशासकीय विभागाची माहिती ठेवावी लागते.तो विधानसभेत मंत्रिमंडळाचा नेतृत्व करतो.

**७) राज्याचा व जनतेचा नेता -** मुख्यमंत्री हा खऱ्या अर्थाने जनतेचा नेता असतो.निवडणुका मुख्यमंत्र्याच्या नावाने लढविल्या जातात.जनता मतदान करतांना मुख्यमंत्री पदाचा उमेदवार कोण आहे याचा विचार करून मतदान करतात.त्यामुळे मुख्यमंत्री जनतेच्या इच्छा आंकाक्षा लक्षात घेऊन जनहित साध्य करण्याचा प्रयत्न करतो.

**८) मंत्रीमंडळात समन्वय निर्माण करणे -** मंत्रिमंडळाचा नेता या नात्याने मंत्र्यामध्ये समन्वय निर्माण करण्याचे कार्य त्याला करावे लागते.मंत्र्यामध्ये वा दोन खात्यात वाद वा संघर्ष निर्माण झाल्यास त्यात मध्यस्थी करण्याचे कार्य मुख्यमंत्र्याला करावे लागते.

**९) इतर कार्य -** राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका राज्यपाल करत असला तरी त्या नेमणुका मुख्यमंत्र्याच्या शिफारशीनुसार केल्या जातात.मुख्यमंत्री राज्यपालाना विधानसभा बरखास्त करण्याची शिफारश करू शकतो.शासनाचा प्रमुख या नात्याने शासनाचे धोरण ठरविणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे आणि त्या कार्यावर नियंत्रण ठेवणे इ.कार्य त्याला पार पाडावी लागतात.

**प्र.६वा राज्यमंत्रीमंडळाची नियुक्ती, प्रकार, अधिकार व कार्य सांगा.**

भारतात प्रत्येक घटकराज्यात मंत्रिमंडळाला निर्मिती केलेली आहे.मुख्यमंत्र्याच्या सल्लाने राज्यपाल इतर मंत्र्यांची नेमणूक करतो.मंत्र्यामध्ये खातेवाटपाचे कार्य मुख्यमंत्री करतो.मंत्रिमंडळात किती मंत्री असावेत, कोणाला मंत्री म्हणून समाविष्ट करावे याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री घेतो.भारतात साधारणतः कॅबिनेट, राज्यमंत्री व उपमंत्री हे तीन प्रकारचे मंत्री दिसून येतात.

**बैठक व कार्यकाल -** मंत्रिमंडळाची बैठक बोलविण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याला असतो.त्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या बैठका होत असतात.मंत्रिमंडळाचा घटनेनुसार ५ वर्ष इतका कार्यकाल असतो.पण प्रत्यक्षात हा कार्यकाल अनिश्चित मानला जातो.कारण जापर्यंत विधानसभेचा विश्वास आहे तोपर्यंत मख्यमंत्री व मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते.विधानसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास मंत्रिमंडळाला राजिनामा द्यावा लागतो.मुख्यमंत्री सामुहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते.

**अधिकार व कार्य -** राज्याचा सर्व राज्यकारभार राज्यपालाच्या नावाने चालत असला तरी प्रत्यक्षात मंत्रिमंडळाच्या सल्लानुसार राज्यकारभार चालू असतो.राज्यकारभार चालविण्यासाठी मंत्रिमंडळाला पुढिल कार्य करावी लागतात.

**१) धोरण निश्चित करणे-** प्रत्येक पक्ष निवडणुकीच्या काळात जनतेला आश्वासने देत असतो.सत्तेवर आल्यानंतर आश्वासनाचे रूपांतर धोरणात करावे लागते.जनतेच प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक खात्याच्या कार्यासंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय सर्व संमतीने घेतले जातात.त्यानंतर ते धोरण विधीमंडळाकडून मंजूर करून घेणे हे मंत्रीमंडळाचे पूरक कार्य असते.

**२) कायदेविषयक कार्य-** मंत्रिमंडळाचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्याला पाहिजे ते कायदे विधिमंडळाकडून मंजूर करून घेणे.विधिमंडळाच्या बैठकीत भाग घेण्याचा आणि विधेयक मांडण्याचा अधिकार मंत्र्यांना असतो.जास्तीत जास्त विधेयके मंत्र्याकडून मांडली जातात.त्यांना सरकारी विधेयक असे म्हणतात.मंत्रिमंडळाच्या पाठिशी बहुमत असल्यामुळे मंत्र्याने मांडलेले विधेयक सहज मंजूर होते.विधिमंडळाचे अधिवेशन केव्हा बोलवावे, स्थगित करावे.हा अधिकार राज्यपालांना असला तरी तो मंत्रिमंडळाच्या सल्लाने निर्णय घेतो.

**३) राज्यकारभार चालविणे -** संपूर्ण राज्याच्या प्रशासनाची जबाबदारी मंत्रिमंडळाकडे असते.प्रत्येक मंत्री आपल्या खात्याचे कार्य सांभाळतो.मंत्रिमंडळाने निश्चित केलेल्या धोरणानुसार निर्णय घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी मंत्रिमंडळाला करावी लागते.निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सनदी अधिकाऱ्यांची मदत घेतली जाते.प्रशासकिय अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते.कायदेमंडळाने केलेले कायदे आणि न्यायालयाने दिलेले निर्णय यांची अंमलबजावणी मंत्रिमंडळाला करावी लागते.या कार्यावर मंत्रिमंडळाचे यश अवलंबून असते.

**४) समन्वयात्मक कार्य -** भारतात काही राज्याचा आकार प्रचंड मोठा असल्याने प्रशासनाचे मोठया प्रमाणावर विकेंद्रीकरण वा सत्ताविभाजन झालेले आहे.विकेंद्रीकरणामुळे एका खात्याचे कार्य दुसऱ्या खात्याच्या कार्याला घातक ठरू नये याची दक्षता मंत्रिमंडळाला घ्यावी लागते.शासनाच्या दोन खात्यांनी परस्परविरोधी नियम केल्यास मंत्रिमंडळाच्या धोरणाला धोका पोहचतो.म्हणून विविध खात्यामध्ये समन्वय प्रस्तापित करण्यासाठी आंतरमंत्रिमंडळ समित्या निर्माण केलेल्या असतात.धोरणात्मक बाबतीत दोन खात्यात वाद निर्माण झाल्यास मुख्यमंत्र्याच्या मध्यस्थीने त्या वादाचे निराकरण केले जाते.मंत्रिमंडळात समन्वय निर्माण करण्याचे कार्य मुख्यमंत्र्याला करावे लागते.

**५) आर्थिक कार्य -** घटनेने राज्यपालांना जे आर्थिक अधिकार दिलेले आहेत त्यांचा वापर मंत्रिमंडळ करीत असते.अंदाजपत्रक तयार करणे अर्थमंत्र्याचे काम असते.अर्थमंत्री अंदाजपत्रक तयार करण्याआधी विविध खात्यातून येणाऱ्या मागण्यांचा विचार करून अंदाजपत्रक तयार करतो.त्या अंदाजपत्रकावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर ते विधिमंडळात मांडले जाते.विधिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर मंत्रिमंडळाला प्रशासकिय खर्च करता येतो.

**६) इतर कार्य -** वरिल कार्याशिवाय राज्यपालच्या वटहुकूमांचा मसुदा मंत्रिमंडळ तयार करत असते.मंत्रिमंडळ गरजेनुसार वेगवेगळे आयोग नेमू शकतो.त्या आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नेमू शकतो.राज्यपालाचे अभिभाषण तयार करण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते.राज्यपालांना जे घटनेने नेमणुकाचे अधिकार दिलेले आहेत.त्या सर्व नेमणुका मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार होतात.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. भारताच्या पहिल्या व विद्यमान राष्ट्रपती नांवे सांगा.
   उत्तर - भारताचे प्रथम डॉ.राजेद्र प्रसाद आणि विद्यमान राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आहेत.

२. भारताच्या राष्ट्रपतीच्या निवडणुकीत कोण मतदार असतात.
   उत्तर - राष्ट्रपतीच्या निवडणुकीत लोकसभा व राज्यसभा निर्वाचित सदस्य आणि विधानसभा निर्वाचित सदस्यांना मतदानाचा अधिकार असतो.

३. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत कोणत्या मतदान पद्धतीचा वापर केला जातो.
   उत्तर - राष्ट्रपतीच्या निवडणुकीत प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धत वा क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो.

४. विद्यमान राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीची नांवे सांगा.
   उत्तर - राष्ट्रपती प्रणव मुखर्जी तर उपराष्ट्रपती हमीद अंन्सारी आहेत.

५. भारतातील प्रथम व विद्यमान पंतप्रधानाची नांवे सांगा.
   उत्तर - भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित नेहरू आणि विद्यमान पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग आहेत.

६. मंत्रीमंडळाचे प्रमुख प्रकार सांगा.
   उत्तर- मंत्रीमंडळाचे कॅबिनेट मंत्री, राज्य मंत्री व उपमंत्री इ.प्रमुख प्रकारचे मंत्री असतात.

७. राज्यपालाचे स्वविवेकाधिन अधिकार कोणते?
   उत्तर - घटकराज्याचा घटनात्मकरीत्या राज्यकारभार चालवणे अशक्य असेल तर राज्यपाल तशा अहवाल राष्ट्रपतीला पाठवू शकतो.राष्ट्रपतीची खात्री झाल्यास संबंधित राज्यासाठी राष्ट्रपती राजवट घोषित करू शकतो.तसेच राज्यपाल राज्याच्या विधीमंडळाने मंजूर विधेयक राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी राखून ठेवू शकतो हे राज्यपालाचे स्वविवेकाधिन अधिकार आहेत.

८. महाराष्ट्राच्या विद्यमान राज्यपाल व मुख्यमंत्र्याचे नांवे सांगा.
   उत्तर - महाराष्ट्राचे विद्यामान राज्यपाल के.शंकरनारायण तर मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आहेत.

९. उपराष्ट्रपतीची निवड कोणत्या सदस्याकडून होते.
   उत्तर -उपराष्ट्रपतीची निवड लोकसभा व राज्यसभा निर्वाचित सदस्याकडून होत असते.

१०. राज्यपालाची नियुक्ती व बरखास्ती कोण करतो?
   उत्तर - राज्यपालाची नियुक्ती व बरखास्ती राष्ट्रपती करत असतो.

११. मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची नियुक्ती कोण करतो.
   उत्तर- घटनेनुसार मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची नियुक्ती राज्यपाल करतो.

# प्रकरण २ रे
# कायदेमंडळ

**प्र.१ ला. राज्यसभेची रचना सांगुन अधिकार व कार्य स्पष्ट करा?**

घटनेच्या ७९ व्या कलमानुसार भारतासाठी एक संसद असेल आणि त्यात राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश ही तरतूद आहे.राज्यसभा संसदेचे वरिष्ठ सभागृह असून घटकराज्यांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व देण्यासाठी हे सभागृह निर्माण केलेले आहे.भारतात अमेरिकेप्रमाणे सर्व घटकराज्यांना समान जागा दिलेल्या नाहीत.लोकसंख्येच्या आधारावर राज्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व दिलेले आहे.उदा.उत्तरप्रदेश ३४ जागा, महाराष्ट्र १९ जागा तर मिझोराम १ जागा. राज्यसभेची सदस्य संख्या २५० इतकी असून त्यापैकी २३८ जागा घटकराज्यांच्या विधानसभेकडून निवडले जातात.आणि उरलेले १२ सदस्य कला, विज्ञान, साहित्य व समाजसेवा क्षेत्रातील नामांकित व्यक्तीची राष्ट्रपतीकडून नेमणूक केली जाते.

**पात्रता -** राज्यसभेची निवडणूक लढविण्यासाठी पुढील पात्रता सांगितली जाते.

१) ती व्यक्ती भारतीय नागरिक असावा.
२) त्याने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेले असावे.
३) तो सरकारी नोकर किंवा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा.
४) संसदेने वेळावेळी निश्चित केलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या पाहिजेत.

**कार्यकाल -** राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे.ते कधीही बरखास्त होत नाही.राज्यसभा सदस्यांचा कार्यकाल ६ वर्ष इतका असतो.दर दोन वर्षानी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य निवडले जातात.राज्यसभा सदस्य निवडण्याचा अधिकार घटकराज्यातील विधानसभा सदस्यांना आहे.विधानसभा सदस्य क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब करून राज्यसभा सदस्य निवडतात.

**सभापती व अधिवेशन -**उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पद्सिद्ध सभापती असतो.त्याच्या गैरहजेरीत कामकाज चालविण्यासाठी सदस्य आपल्यामधून एकाची उपसभापती म्हणून निवड करतात.सभापतीला पुढील अधिकार असतात.

१) सभागृहात शिस्त व शांतता निर्माण करणे
२) सदस्यांना विधेयक मांडण्याची परवानगी देणे, विधेयकावर चर्चा घडवून आणणे, विधेयकावर मतदान घेणे, विधेयक मंजूर झाल्यास दुसऱ्या सभागृहाकडे पाठविणे.
३) विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.
४) राज्यसभेतील कामकाजाबाबत योग्य त्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.
५) सदस्यांना प्रश्न व माहिती विचारण्याची परवानगी देणे.

वरील अधिकार राज्यसभा सभापतींना आहेत.राज्यसभेची वर्षातून कमीत-कमी दोन अधिवेशने भरतात.राज्यसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी १/३ सदस्य सभागृहात उपस्थित असणे आवश्यक असते.

**राज्यसभा अधिकार व कार्य -** राज्यसभेला काही बाबतीत लोकसभेच्या बरोबरीने तर काही बाबतीत दुय्यम स्वरूपाचे अधिकार दिलेले आहेत.ते पुढील प्रमाणे आहेत.

**१) कायदेविषयक अधिकार -** लोकसभा आणि राज्यसभेच्या संमतीशिवाय कोणत्याही विधेयकाचे कायदयात रूपांतर होऊ शकत नाही.अर्थ विधेयकाशिवाय कोणतेही विधेयक राज्यसभेत मांडता येते.राज्यसभेची मंजूरी मिळाल्यावर ते लोकसभेत मांडले जाते.लोकसभा ते विधेयक मंजूर करू शकते, दुरूस्त करू शकते वा फेटाळू शकते.एखादया विधेयकावरून दोन्ही गृहात मतभेद झाल्यास राष्ट्रपती दोन्ही गृहाचे संयुक्त अधिवेशन बोलवितो.या अधिवेशनात मतभेद मिटवले जातात.संयुक्त अधिवेशनात लोकसभेचा विजय होण्याची शक्यता जास्त असते.कारण लोकसभेची सदस्यसंख्या राज्यसभेपेक्षा जास्त असते.

२) **आर्थिक अधिकार -** अर्थ विधेयक प्रथम लोकसभेत मांडले जाते.तेथे मंजुरी मिळाल्यानंतर ते राज्यसभेत मांडले जाते.राज्यसभेने १४ दिवसांच्या आत अर्थविधेयक मंजूर करावे अन्यथा ते विधेयक राज्यसभेने मान्य केले असे समजले जाते.अर्थ विधेयकावर राज्यसभेने सुचविलेल्या दुरूस्त्या स्वीकारणे वा नाकारणे लोकसभेच्या मर्जीवर अवलंबून असते.याचा अर्थ आर्थिक बाबतीत राज्यसभेला दुय्यम अधिकार आहेत.

३) **कार्यकारी अधिकार -** घटनेनुसार मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असते.राज्यसभा अविश्वास प्रस्ताव मांडून मंत्रिमंडळ बरखास्त करु शकत नाही.तरी देखील मंत्र्यांना लेखी व तोंडी प्रश्न विचारणे, सरकारवर टीका करणे, मंत्रिमंडळाने मांडलेले विधेयक फेटाळणे, कामरोखो प्रस्ताव, लक्षवेधी सुचना, सभात्याग इ.मार्गाने राज्यसभा मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवू शकते.राज्यसभेचा पाठिंबा मिळविण्यासाठी राज्यसभेतून काही मंत्री मंत्रिमंडळात घेतले जातात.

४) **घटनादुरूस्ती व इतर अधिकार -** घटनादुरूस्ती बाबत राज्यसभेला लोकसभे इतके अधिकार आहेत.राज्यसभेच्या संमतीशिवाय कोणतीही घटनादुरूस्ती होऊ शकत नाही.राज्यसभा सदस्य राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीत भाग घेऊ शकतात.उपराष्ट्रपतीला पद्भ्रष्ट करतांना राज्यसभेला पुढाकार घ्यावा लागतो.तसेच राष्ट्रपतीवर महाभियोग प्रक्रिया चालू असतांना आरोपाची चौकशी करण्याचा अधिकार राज्यसभेला आहे.जनकल्याणाकरिता राज्यसभेला अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याचा अधिकार आहे.राज्यसूचीतील विषयावर कायदा करतांना राज्यसभेत प्रथम विधेयक मंजूर करावे लागते.

**प्र.२रा लोकसभेची रचना सांगुन अधिकार व कार्य स्पष्ट करा?**

लोकसभा संसदेचे प्रथम आणि कनिष्ठ सभागृह आहे.या गृहात जनतेचे प्रतिनिधी असतात.जनता प्रत्यक्ष व गुप्त मतदानाने लोकसभेचे सदस्य निवडून देत असते.लोकसभेची सदस्यसंख्या ५४५ इतकी असून ५२५ सदस्य विविध घटकराज्यातून आणि उरलेले २० सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडले जातात.ॲग्लो इंडियन समाजाला योग्य प्रतिनिधित्व न मिळाल्यास राष्ट्रपती त्या समाजातील दोन व्यक्तीची नेमणूक लोकसभेत करू शकतो.लोकसभेचे काही मतदारसंघ अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव ठेवलेले आहेत.१० लोकसंख्येसाठी एक प्रादेशिक मतदारसंघ निर्माण केला जातो.जनता प्रत्यक्ष व गुप्त मतदानाने एका प्रतिनिधीची निवड करते.

**पात्रता -** लोकसभेची निवडणुक लढविण्यासाठी पुढील पात्रता सांगितली जाते.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) त्याने वयाची २५ वर्ष पूर्ण केलेले असावे.
३) तो सरकारी नोकर वा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा.
४) संसदेने वेळावेळी निश्चित केलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या पाहिजेत.

**कार्यकाल -** लोकसभेचा कार्यकाल ५ वर्ष इतका आहे.आणीबाणीच्या काळात हा कार्यकाल १ वर्षाने वाढवता येतो.प्रत्यक्षात लोकसभेचा कार्यकाल अनिश्चित मानला जातो.कारण राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्लाने लोकसभा बरखास्त करू शकतो.

**अधिवेशन व गणसंख्या -** लोकसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी १/१० इतकी सदस्य संख्या सभागृहात हजर राहणे आवश्यक असते.लोकसभेचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार राष्ट्रपतीना असला तरी दोन अधिवेशना दरम्यान १८० दिवसापेक्षा जास्त अंतर असू नये हे घटनात्मक बंधन आहे.त्यामुळे लोकसभेची वर्षातून कमीत कमी दोन अधिवेशने भरतात.

**अधिकार व कार्य -** लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असल्यामुळे या सभागृहाला व्यापक अधिकार दिलेले आहेत ते पुढील प्रमाणे होत.

**१) कायदेविषयक अधिकार -** केंद्रसुची आणि समवर्ती सूचीतील विषयावर कायदा करण्याचे विधेयक लोकसभेत मांडता येते, तेथे मंजुरी मिळाल्यानंतर राज्यसभेत जाते.राज्यसभेने मान्यता दिल्यानंतर विधेयकाचे कायदयात रूपांतर होते.याचा अर्थ लोकसभेच्या संमती शिवाय कोणत्याही विधेयकाचे कायदयात रूपांतर होऊ शकत नाही.एखादया विधेयकावरून दोन्ही गृहात मतभेद झाल्यास राष्ट्रपती संयुक्त अधिवेशन बोलवितो.या

अधिवेशनात मतभेद मिटवले जातात.संयुक्त अधिवेशनात लोकसभेची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे लोकसभेचा विजय होण्याची दाट शक्यता असते.

**२) आर्थिक अधिकार -** आर्थिक विधेयक प्रथम लोकसभेत मांडले जाते.अर्थ विधेयक कोणते हे लोकसभेचा सभापती ठरवतो. अर्थ विधेयकाला लोकसभेने मान्यता दिल्यानंतर राज्यसभेत जाते.राज्यसभेने १४ दिवसाच्या आंत मान्यता द्यावी वा अमान्य करावे अन्यथा ते राज्यसभेने मान्य केले असे समजले जाते.अर्थ विधेयकावर राज्यसभेने सुचविलेल्या दुरूस्त्या स्वीकारणे वा नाकारणे लोकसभेच्या मर्जीवर अवलंबून असते.याचा अर्थ आर्थिक बाबतीत लोकसभेला व्यापक अधिकार आहेत.

**३) कार्यकारी अधिकार -** घटनेनुसार मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असते.जोपर्यंत लोकसभेचा विश्वास आहे तोपर्यंत मंत्रिमंडळाला सत्तेवर राहता येते.लोकसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास मंत्रिमंडळाला द्यावा लागतो.याशिवाय मंत्रिमंडळाला लेंखी व तोंडी प्रश्न विचारणे, सरकारवर टीका करणे, मंत्रिमंडळाने मांडलेले विधेयक फेटाळणे, कामरोखो प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, सभात्याग, कपात सूचना इ.माध्यमातून लोकसभा मंत्रिमंडळावर ठेवत असते.

**४) घटनादुरूस्ती व इतर अधिकार-** लोकसभेला राज्यसभेच्या बरोबरीने घटनादुरूस्ती अधिकार आहेत.लोकसभा आणि राज्यसभेने घटनादुरूस्ती विधेयकास मान्यता दिल्यास त्या विधेयकावर राष्ट्रपतीची सही झाल्यास घटनादुरूस्ती अंमलात येते.याशिवाय लोकसभा सदस्य राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुकीत भाग घेऊ शकतात.उपराष्ट्रपती निवडणुकीत लोकसभेची सदस्य संख्या जास्त असल्याने त्यांचा प्रभाव पडू शकतो.राष्ट्रपतीवर महाभियोग लागू करतांना आरोपपत्र मंजूर करण्याचे कार्य लोकसभेला करावे लागते.लोकसभा हे जनतेचे सभागृह असल्याने जनतेच्या तक्रारींना वाचा फोडण्याचे कार्य या गृहातील सदस्यांना करावे लागते.

**लोकसभा सभापती वा लोकसभाध्यक्ष -**

लोकसभेच्या निवडणुकानंतर भरणाऱ्या पहिल्या अधिवेशनात लोकसभा सदस्य आपल्यामधुन एकाची सभापती आणि दुसऱ्यांची उपसभापती म्हणून निवड करतात.सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती कामकाज सांभाळतो.दोन्हीच्या गैरहजेरीत सहा लोंकाचे सभापती मंडळ असते.या मंडळातील सदस्य क्रमाक्रमाने कामकाज चालवतात.सभापतीचा कार्यकाल लोकसभेच्या कार्यकाला इतका असतो.लोकसभेने अविश्वास प्रस्ताव मंजुर केल्यास सभापतीला पदाचा राजिनामा द्यावा लागतो.सभापती पद अत्यंत मानाचे व प्रतिष्ठेचे मानले जाते.सद्या लोकसभेचे सभापती मीराकुमार आहेत.

**लोकसभा सभापती अधिकार व कार्य -** लोकसभा सभापतीला पुढिल कार्य पार पाडावी लागतात.

१) राष्ट्रपतीने केलेल्या अभिभाषणातील निरनिराळया विषयावर चर्चा घडवून आणणे.

२) अर्थविधेयक कोणते ते ठरविणे तसेच संयुक्त अधिवेशनाचा अध्यक्ष असतो.

३) सभागृहात शिस्त, शांतता व सुव्यवस्था प्रस्तापित करणे.एखादया सदस्य गृहात गोंधळ करत असेल तर सभागृहातून निलंबित करणे.गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असेल तर सभागृहाचे कामकाज स्थगित करणे.

४) सभागृहात सदस्यांना विधेयक माडण्याची, प्रश्न मांडण्याची परवानगी देणे, विधेयकावर चर्चा घडवून आणणे, चर्चेनंतर मतदान घेणे, विधेयक मंजूर झाल्यास सही करून दुसऱ्या गृहाकडे पाठविणे.

५) हिंदी वा इंग्रजीतून आपले विचार व्यक्त करण्यास सदस्य असमर्थ असल्यास मातृभाषेतून बोलण्याची परवानगी देणे.

६) विधेयकाचे प्रकाशन सभापतीच्या संमतीने सरकारी गॅझेट मध्ये केले जाते तसेच प्रवर समितीचा अध्यक्ष नेमणे हा अधिकार सभापतीला असतो.

७) एखादया विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतीना असतो.

८) लोकसभा सभापतीचा निर्णय सदस्याला अमान्य करता येत नाही.आणि त्या निर्णयाची योग्यता ठरविण्यासाठी न्यायालयात जाता येत नाही.

लोकसभा सभापतीला व्यापक अधिकार दिल्यामुळे हे पद अत्यंत प्रतिष्ठेचे आणि महत्त्वपूर्ण मानले जाते.

**प्र.३ रा संसदेची कायदे निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा?**

घटनेने संसदेला कायदे निर्मितीचा अधिकार दिलेला आहे.कारण शासनाला संसदेने निर्माण केलेल्या कायदयावर आधारावर धोरण तयार करावे लागते.विधेयकाच्या बाबतीत सामान्य विधेयक व आर्थिक विधेयक हे दोन मुख्य दोन प्रकार केले जातात.सामान्य विधेयक कोणत्याही सभागृहात मांडता येते.पण आर्थिक विधेयक प्रथम लोकसभेत मांडावे लागते.साधारण विधेयकाचे सरकारी विधेयक व खाजगी विधेयक हे उपप्रकार पडतात.खाजगी विधेयक कोणत्याही सदस्याला मांडता येते.मात्र सरकारी विधेयक मंत्र्याकडून मांडले जाते.विधेयकाचे कायदयात रूपांतर करण्यासाठी पुढील प्रक्रिया वा टप्पे करावे लागतात.

१) **प्रथम वाचन -** सभापतीच्या संमतीने सदस्याला विधेयक मांडता येते.विधेयक मांडण्याची परवानगी दिल्यानंतर सभापती चर्चेसाठी वेळ व दिनांक निश्चित करतो.चर्चेच्या आधी विधेयकाच्या प्रती सर्व सदस्यांना दिल्या जातात.विधेयक मांडणारा सदस्य विधेयकाचे महत्त्व पटवून देतो.त्यानंतर इतर सदस्य विधेयकावर चर्चा करतात.चर्चेत मतभेद झाल्यास सभापती विधेयकावर मतदान घेतो.मतदानात विधेयकाचा विजय झाल्यास दुसरी प्रक्रिया सुरू होते.

२) **द्वितीय वाचन -** द्वितीय वाचनात विधेयकावर तपशीलवारपणे चर्चा घडवून आणली जाते किंवा सखोल अभ्यासासाठी विधेयक समितीकडे पाठवावे हा निर्णय घेतला जातो.विधेयक अत्यंत महत्त्वाचे असेल तर जनतेच्या सूचना मिळविण्यासाठी ते सरकारी गॅझेट मध्ये प्रसिद्ध केले जाते.जनतेकडून झालेल्या सूचनाचा सभापतीकडून विचार केला जातो.त्यानंतर ते विधेयक समितीकडे पाठविले जाते.

३) **समिती अवस्था -** या अवस्थेत विधेयकाचा सखोल अभ्यास केला जातो.समितीत विधेयक मांडणारा सदस्य, कायदा मंत्री व विरोधी पक्षाचे सदस्य सुद्धा असतात.समितीत विधेयकाचा विचार करुन चर्चाच्या माध्यामातून काही दुरूस्त्या सुचविल्या जातात आणि तसा अहवाल सभागृहाला सादर केला जातो.

४) **तृतीय वाचन -** समितीने दिलेल्या अहवालावर तिसऱ्या वाचनात चर्चा होते.समितीने सुचविलेल्या दुरूस्त्यांचाही विचार केला जातो.चर्चेनंतर विधेयकावर मतदान घेतले जाते.सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतर ते विधेयक दुसऱ्या गृहाकडे पाठविले जाते.

५) **दुसऱ्या सभागृहाची मंजुरी -** प्रथम गृहात प्रथम वाचनापासून ते तिसऱ्या वाचना पर्यंत ज्या प्रक्रिया पार पाडल्या जातात त्याच प्रक्रिया दुसऱ्या सभागृहात पार पाडव्या लागतात.या प्रक्रिया पार पाडल्यानंतर विधेयकावर मतदान घेतले जाते.मतदानात गृहाने मान्यता दिली तर विधेयक राष्ट्रपतीकडे जाते.मात्र विधेयकावरून दोन्ही गृहात मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलवून मतभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो.

६) **राष्ट्रपतीची स्वाक्षरी -** संसदेच्या दोन्ही गृहानी संमत केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतीची सही झाल्यास विधेयकाचे कायदयात रूपांतर होते.राष्ट्रपती विधेयकावर सही करू शकतो किंवा विधेयक फेटाळू शकतो.राष्ट्रपतीने नामंजूर केलेल्या विधेयकास दोन्ही गृहांनी पुन्हा मान्यता दिल्यास राष्ट्रपतीला सही करावीच लागते.

**प्र.४ था. विधानपरिषदेची रचना सांगुन अधिकार व कार्य सांगा.**

घटकराज्याच्या कायदेमंडळात राज्यपाल, विधानसभा आणि विधानपरिषद यांचा समावेश होतो.विधानसभा राज्यकायदेमंडळाचे कनिष्ठ सभागृह असून ते प्रत्येक राज्यात अस्तित्वात आहे.विधानपरिषद हे कायदेमंडळाचे वरिष्ठ सभागृह असून ते भारतातील उत्तरप्रदेश, बिहार, जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र आणि कर्नाटक या पाच राज्यात द्विगृही सभागृह अस्तित्वात आहे.विधानपरिषद निर्माण करण्याचा आणि नष्ट करण्याचा अधिकार घटनेनुसार विधानसभेला आहे.

**विधानपरिषद रचना-** विधानपरिषदेची सदस्य संख्या जास्तीत जास्त विधानसभेच्या १/३ आणि कमीत कमी ४० असणे आवश्यक असते.महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत ७८ सदस्य आहेत.परिषदेचे सदस्य पुढील मार्गाने निवडून येतात.

१) विधानपरिषदेच्या एकूण सदस्यांपैकी १/३ सदस्य विधानसभा सदस्यांकडून निवडले जातात.
२) विधानपरिषदेच्या १/३ जागा स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निवडल्या जातात.त्यात जिल्हापरिषद सदस्य, नगरपालिका आणि महानगरपालिका नगरसेवकांना मतदानाचा अधिकार असतो.
३) १/१२ जागा शिक्षक मतदारसंघातर्फे निवडले जातात.३ वर्ष सेवा केलेल्या शिक्षकाला नांव नोदविता येते.नोंदीशिवाय मतदान करता येत नाही.
४) १/१२ जागा पदवीधरासाठी असतात.पदवी मिळाल्यानंतर आपले नांव मतदारयादी नोंदविता येते.
५) विधानपरिषदेच्या १/९ जागा (१२ जागा) नेमणूक करण्याचा अधिकार राज्यपालांना असतो.कला, साहित्य, विज्ञान आणि समाजसेवा क्षेत्रातील व्यक्तीची राज्यपाल नेमणूक करत असतो.

**पात्रता -** विधानपरिषद निवडणुक लढविण्यासाठी पुढिल पात्रता सांगितली जाते.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) त्याने वयाची ३० वर्ष पूर्ण केलेले असावे.
३) तो सरकारी नोकर वा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा.
४) संसदेने वेळावेळी निश्चित केलेल्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

**कार्यकाल -** विधानपरिषद सदस्यांचा कार्यकाल ६ वर्ष इतका असतो.दर दोन वर्षानी १/३ सदस्य निवृत्त होतात निवडणुकीने तेवढयाच जागा भरल्या जातात.विधानपरिषद हे स्थायी सभागृह आहे.

**सभापती -** विधानपरिषद सदस्य आपल्यामधुन एकाची सभापती व दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड करतात.सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती गृहाचे कामकाज सांभाळतो.सभापतीला पुढील कार्य करावी लागतात.

१) सभागृहात शांतता व शिस्त निर्माण करणे शांतता भंग करणाऱ्या सदस्यांला निलंबित करणे.
२) सभागृहाचे गोंधळामुळे कामकाज चालविणे अशक्य असेल तर कामकाज स्थगित करणे.
३) सदस्यांना विधेयक मांडण्याची परवानगी देणे, प्रश्न विचारण्याची परवानगी देणे.
४) विधेयकावर चर्चा घडवून आणणे चर्चेनंतर मतदान घेणे, विधेयक मंजूर वा नामंजूर झाले ते गृहाला कळविणे.
५) विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.

**विधानपरिषदेचे अधिकार व कार्य -** विधानपरिषदेला पुढील अधिकार आहेत.

**१) कायदेविषयक अधिकार -** अर्थ विधेयकाशिवास कोणतेही विधेयक विधानपरिषदेत मांडता येते.विधानसभेने मंजूर केलेले विधेयक परिषदेकडे येते.परिषद ते पास करू शकते, फेटाळू शकते वा दुरूस्त्या करू शकते पण ही कार्यवाही तीन महिन्याच्या आत करावी लागते.अन्यथा हे विधेयक परिषदेने मान्य केले हे समजले जाते.एखादया विधेयकावरून दोन्ही गृहात मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही.त्याबाबत विधानसभेचा निर्णय योग्य मानून कार्यवाही केली जाते.

**२) आर्थिक अधिकार -** अर्थ विधेयक प्रथम विधानसभेत मांडले जाते. तेथे मान्यता मिळाल्यानंतर विधानपरिषदेत मांडले जाते.परिषदेने १४ दिवसांच्या आत मंजूर वा नामंजूर करावे.अन्यथा ते परिषदेने मंजूर केले असे समजले जाते.अर्थ विधेयकावर परिषदेने सुचविलेल्या दुरूस्त्या स्वीकारणे वा नाकारणे विधानसभेवर अवलंबून असते.परिषदेला आर्थिक बाबतीत दुय्यम अधिकार दिलेले आहेत.

**३) कार्यकारी अधिकार -** मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार असते.त्यामुळे परिषद मंत्रिमंडळ बरखास्त करू शकत नाही.तरी देखील प्रश्न विचारणे, सरकारने मांडलेले विधेयक फेटाळणे, सरकारवर टीका करणे, कामरोको प्रस्ताव, लक्षवेधी सूचना,सभात्याग, कामकाजावर बहिष्कार इ.मार्गाने परिषद सरकार वर नियंत्रण ठेऊ शकते.

वरिल अधिकारांचा विचार करता विधानपरिषदेला अत्यंत मर्यादित अधिकार दिलेले दिसतात.त्यामुळे हे सभागृह दुर्बल मानले जाते.काही लोक हे सभागृह बरखास्त करावे अशी मागणी करतात पण राजकीय कारणासाठी काही राज्यात हे सभागृह आजही अस्तित्वात दिसून येते.

**प्र.५ वा. विधानसभेची रचना सांगुन अधिकार व कार्य व रचना स्पष्ट करा?**

घटनेच्या १७० व्या कलमानुसार प्रत्येक राज्यात विधानसभा असते.विधानसभा हे राज्य कायदेमंडळाचे कनिष्ठ पण अधिकाराच्या दृष्टीने वरिष्ठ सभागृह आहे.विधानसभेत कमीत-कमी ६० आणि जास्तीत-जास्त ५०० सभासद असतात.महाराष्ट्राच्या विधानसभेत २८८ सदस्य आहेत.विधानसभा सदस्य प्रत्यक्ष व गुप्त मतदानाद्वारे जनतेमार्फत निवडले जातात.विधानसभेच्या मतदारसंघापैकी काही मतदारसंघ अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव आहेत.

पात्रता - विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी पुढिल पात्रता सांगितल्या जातात.

१. तो भारतीय नागरिक असावा.
२. त्याने वयाची २५ वर्ष पूर्ण केली पाहिजे.
३. तो सरकारी नोकर वा सरकारी संस्थेत लाभदायक पद धारण करणारा नसावा
४. संसदेने वेळावेळी निश्चित केलेल्या अटी पूर्ण केल्या पाहिजे

**कार्यकाल** - विधानसभेचा कार्यकाल ५ वर्ष इतका असतो. आणीबाणीच्या काळात हा कार्यकाल १ वर्षाने वाढतो.मात्र राज्यपाल मुख्यमंत्र्याच्या सल्लाने विधानसभा बरखास्त करू शकतो.त्यामुळे विधानसभेचा कार्यकाल अनिश्चित मानला जातो.

**अधिवेशन व गणसंख्या** - विधानसभेचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार राज्यपालाना आहे.दोन अधिवेशना दरम्यान १८० दिवसापेक्षा जास्त अंतर असू नये हे घटनात्मक बंधन असल्यामुळे विधानसभेची कमीत कमी दोन अधिवेशने बोलविली जातात.विधानसभेचे कामकाज चालविण्यासाठी १/१० अथवा १० यापैकी जी संख्या मोठी असेल ती गणसंख्या मानली जाते.

**विधानसभा सभापती** - विधानसभा सदस्य आपल्यामधुन एकाची सभापती आणि दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड करतात.सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती कामकाज सांभाळतो.सभापतीला पुढील कार्य करावी लागतात.

१) सभागृहात शांतता व शिस्त निर्माण करणे. शांतता भंग करणाऱ्या सदस्यांला निलंबित करणे.
२) सभागृहाचे गोंधळामुळे कामकाज चालविणे अशक्य असेल तर कामकाज स्थगित करणे.
३) सदस्यांना विधेयक मांडण्याची परवानगी देणे, प्रश्न विचारण्याची परवानगी देणे.
४) विधेयकावर चर्चा घडवून आणणे, चर्चनंतर मतदान घेणे, विधेयक मंजूर वा नामंजूर झाले ते गृहाला कळविणे.
५) विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.
६) अर्थ विधेयक कोणते ते ठरविणे.सदस्याला मातृभाषेत विचार मांडण्याची परवानगी देणे.

**विधानसभा अधिकार व कार्य-** विधानसभेला पुढील कार्य पार पाडावी लागतात.

**१) कायदेविषयक अधिकार** - राज्यसूर्ची आणि समवर्ती सुचीतील विषयांवर कायदा करण्याचा अधिकार विधानसभेला आहे.मात्र समवर्तीसुचीतील विषयांवर केंद्राने कायदा केलेला असेल तर राज्याचा कायदा रद्द होतो.विधानसभेत कोणतेही विधेयक मांडता येते.या गृहाची मंजुरी मिळाल्यानंतर ते विधेयक विधानपरिषदेत जाते.एखादया विधेयकावरून दोन्ही गृहात मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही.अशा वेळेस विधानसभेचा निर्णय योग्य मानला जातो.याचा अर्थ कायदेविषयक बाबतीत विधानपरिषदेपेक्षा विधानसभा श्रेष्ठ आहे.

**२) आर्थिक अधिकार** - अर्थविधेयक कोणते हे ठरविण्याचा अधिकार विधानसभा सभापतीना असतो.अर्थविधेयक प्रथम विधानसभेत मांडावे लागते तेथे मंजुरी मिळाल्यानंतर ते परिषदेत मांडले

जाते.परिषदेने १४ दिवसांच्या आत विधेयक ते मंजूर वा नामंजूर करावे अन्यथा विधानपरिषदेने मंजूर केले असे समजले जाते.अर्थ विधेयकावर सुचविलेल्या दुरूस्त्या स्वीकारणे वा नाकारणे विधानसभेच्या मर्जीवर अवलंबून असते.याचा अर्थ विधानसभेला आर्थिक बाबतीत व्यापक अधिकार दिलेले आहेत.

३) **कार्यकारी अधिकार -** घटनेनुसार मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार आहे.विधानसभेचा विश्वास आहे तोपर्यंत मंत्रिमंडळाला सत्तेवर राहता येते.विधानसभेने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास मंत्रिमंडळाला पदाचा राजिनामा द्यावा लागतो.याशिवाय लेंखी व तोंडी प्रश्न विचारणे, सरकारवर टीका करणे, सरकारने मांडलेले विधेयक फेटाळणे, कामरोको प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, सभात्याग, सरकारी कामकाजावर बहिष्कार इ.माध्यमातून विधानसभा मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवू शकते.

४) **घटनादुरूस्ती व इतर अधिकार -** घटनादुरूस्त्यांच्या तिसऱ्या प्रकारासाठी विधानसभेची संमती आवश्यक असते.विधानसभा सदस्य राष्ट्रपतीच्या निवडणुकीत भाग घेऊ शकतात.तसेच राज्यपालांनी नेमलेले विविध आयोग व चौकशी समित्यांचे अहवाल विधानसभेत प्रथम मांडले जातात.हे सभागृह जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे गृह असल्याने या गृहात जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली जाते.

**अपेक्षित वस्तुनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. लोकसभा व राज्यसभेच्या उमेदवारासाठी कमीत कमी वय सांगा.
उत्तर - लोकसभेसाठी २५ वर्ष तर राज्यसभेसाठी ३० वर्ष उमेदवारासाठी अट आहे.

२. विधानसभा व विधानपरिषद उमेदवारीसाठी कमीतकमी वय सांगा.
उत्तर - विधानसभासाठी २५ वर्ष तर विधानपरिषदेसाठी ३० वर्ष उमेदवारासाठी अट आहे.

३. भारतातील केंद्रीय कायदेमंडळाची दोन सभागृहे कोणती?
उत्तर - भारतात राज्यसभा व लोकसभा ही केंद्रीय कायदेमंडळाची दोन सभागृहे आहेत.

४. लोकसभा व राज्यसभा विद्यमान सभापतीची नांवे सांगा.
उत्तर - लोकसभेच्या सभापती मीराकुमारी आणि राज्यसभा सभापती हमीद अंन्सारी आहेत.

५. राज्यसभेचा पद्सिद्ध कोण असतो.
उत्तर- उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पद्सिद्ध सभापती असतो.

६. भारतीय संसदेतील दोन संसदीय समित्यांची नांवे सांगा.
उत्तर - भारतीय संसदेत लोकलेखा समिती, अंदाजपत्रक समिती आणि सार्वजनिक उद्योग समिती इ.समित्या असतात.

७. महाराष्ट्रातून लोकसभा व राज्यसभेवर किती सदस्य निवडुन दिले जातात?
उत्तर - महाराष्ट्रातून लोकसभेचे ४८ तर राज्यसभेचे १९ सदस्य निवडुन दिले जातात.

८. लोकसभा व राज्यसभेची सदस्य संख्या सांगा.
उत्तर - लोकसभेची सदस्य संख्या ५४५ तर राज्यसभेची सदस्य संख्या २५० इतकी आहे.

९. भारतात विधानपरिषद अस्तित्वात असलेल्या कोणत्याही दोन राज्यांची नांवे सांगा.
उत्तर - भारतात महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार, कर्नाटक आणि जम्मू-काश्मीर राज्यात विधानपरिषद अस्तित्वात आहे.

१०. महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद सदस्य संख्या सांगा.
उत्तर- महाराष्ट्रातील विधानसभेत २८८ तर विधानपरिषदेत ७८ सदस्य आहेत.

११. विधेयकाचे मुख्य दोन प्रकार सांगा.
उत्तर- साधारण विधयेक आणि आर्थिक विधेयक हे प्रमुख दोन प्रकार आहेत.

## प्रकरण ३ रे
## न्यायमंडळ

**प्र.१ ला. सर्वोच्च न्यायालयाची रचना सांगुन अधिकार व कार्य स्पष्ट करा?**

भारतात अमेरिकेसारखी दुहेरी न्यायव्यवस्था नाही.भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे.न्यायालयाची रचना पिरॅमिड सारखी आहे.सर्वात वरच्या पातळीवर सर्वोच्च न्यायालय त्यानंतर उच्च न्यायालय आणि सर्वात शेवटी दुय्यम न्यायालये ही रचना आहे.सर्वोच्च न्यायालय अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायालय असून त्यांचा निकाल भारतातील सर्व न्यायालयावर बंधनकारक आहे.

**रचना -** घटनेच्या १२४ व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधीश व इतर २७ न्यायाधीश आहेत.त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना आहे मात्र प्रत्यक्षात गृहमंत्र्यालयाच्या शिफारशीनुसार नेमणुका होतात.भारताचे सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे आहे.

**पात्रता -** सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश पदासाठी पुढिल पात्रता असतात.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) उच्च न्यायालयात ५ वर्ष न्यायाधीश पदाचा अनुभव असावा.
३) उच्च न्यायालयात १० वर्ष वकिलीचा अनुभव असावा.
४) राष्ट्रपतीच्या मते ती व्यक्ती सुप्रसिद्ध कायदेपंडित असावी.

**कार्यकाल व वेतन -** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांना वयाच्या ६५ वर्षापर्यत पदावर राहता येते.न्यायाधीशाने घटनाभंग वा गैरप्रकार केल्यास संसदेच्या दोन्ही गृहाने २/३ बहुमताने महाभियोग प्रस्ताव मंजूर केल्यास त्यांना पदाचा राजिनामा द्यावा लागतो.सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशाना एक लाख तर इतर न्यायाधीशाना ९० हजार रुपये इतके मासिक वेतन मिळते.आर्थिक आणीबाणी शिवाय न्यायाधीशांच्या वेतनात कपात करता येत नाही.सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांना निवृत्ती नंतर कोणत्याही न्यायालयात वकिली करता येत नाही.वेतना व्यतिरीक्त वाहन भत्ता, सरकारी निवासस्थान, आरोग्य भत्ता आणि निवृत्ती वेतन मिळते.

**अधिकार व कार्य -** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला व्यापक अधिकार दिलेले आहेत. ते पुढील प्रमाणे होत.

१) **प्रारंभिक अधिकार क्षेत्र -** ज्या खटल्याची सुरूवात सर्वोच्च न्यायालयात प्रथम होऊ शकते.इतर कोणत्याही न्यायालयात ते खटले दाखल करता येत नाही.त्या अधिकाराला प्रारंभिक अधिकार क्षेत्र असे म्हणतात.प्रारंभिक अधिकार क्षेत्रात पुढिल खटल्यांचा समावेश होतो.

१) भारत सरकार विरूद्ध घटकराज्यातील वाद
२) भारत सरकार व इतर घटकराज्यांविरूद्ध घटकराज्य
३) घटकराज्य विरूद्ध घटकराज्य
४) मूलभूत अधिकाऱ्याच्या संरक्षणासाठी बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकार पृच्छा इ.बद्दलचा खटला.
५) केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकारांनी तयार केलेल्या कायदयाच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात उपस्थित करता येतो.

**२) पुनर्निर्णय वा अपिलाचे अधिकार क्षेत्र -** भारतातील कोणत्याही उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.दिवाणी दाव्याबाबत २० हजार पर्यंत रक्कमेचा खटला असेल वा कायदयाच्या अर्थाबाबत वाद निर्माण झालेला असेल तर खटला पुनर्निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतो.फौजदारी खटल्याबाबत दुय्यम न्यायालयानी निर्दोष सोडलेल्या व्यक्तीला उच्च न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा दिलेली असेल किंवा दुय्यम न्यायालयातील खटला आपल्याकडे चालविण्यास घेऊन आरोपीला फाशीची शिक्षा दिली असेल वा हा खटला फेरतपासणी लायक आहे असा शेरा दिला असेल तर हा खटला पुनर्विचारासाठी सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतो.लष्करी न्यायालय सोडून भारतातील कोणत्याही न्यायालयाच्या निकालाविरूद्ध पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

**३) सल्लादायी अधिकार क्षेत्र -** राष्ट्रपती हा कायदे तज्ञ असतोच असे नाही.मात्र त्याने केलेली कृती कायदेशीर असली पाहिजे म्हणून राष्ट्रपतीला सार्वजनिकदृष्टया महत्त्वपूर्ण प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेता येतो हा सल्ला गुप्त आणि राष्ट्रपतीवर बंधनकारक नसतो.उदा. भारत -पाकिस्तान कराराच्या वेळेस राष्टपतीनी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेतला होतो.

**४) पूर्वी दिलेल्या निर्णयाचा पुनर्निर्णयाचा अधिकार -** सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम असतो.पण त्या निर्णयावरून पुन्हा वाद निर्माण झाल्यास सर्वोच्च न्यायालय पूर्वी दिलेला निर्णय बदलू शकते.उदा.गोलकनाथ खटल्याचा निकाल देताना संसदेला घटनादुरूस्ती करून मूलभूत हक्क कमी करता येणार नाही हा निकाल दिला.मात्र केशवानंद भारती खटल्याचा निकाल देतांना संसदेला घटनादुरूस्तीच्या मार्गाने घटनेच्या कोणत्याही भागात बदल करता येईल हा निकाल देऊन पूर्वीचा निकाल बदलला.

**५) अभिलेख न्यायालय आणि घटनेचे संरक्षण करणे -** सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय आहे.तेथे चालणाऱ्या कामकाजाची लेखी नोंद घेतली जाते.कारण भावी काळात त्या नोंदीचा पुरावा म्हणून वापर केला जातो.तसेच घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे.संसद वा मंत्रिमंडळाने घटनाबाहय कायदा केल्यास तो रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.त्या अधिकाराचा वापर करून सर्वोच्च न्यायालय घटनेचे संरक्षण करते.

**प्र.२ रा उच्च न्यायालयाची रचना सांगुन अधिकार व कार्य स्पष्ट करा?**

घटनेच्या २९४ व्या कलमानुसार प्रत्येक घटकराज्यात उच्च न्यायालयाची स्थापना करता येते.मात्र संसद कायदा करून दोन किंवा दोनापेक्षा जास्त राज्यासाठी एकच उच्च न्यायालय निर्माण करू शकते.उदा.ईशान्य भारतातील मणिपूर, मिझोरम, आसाम राज्याकरीता एकच उच्च न्यायालय आहे.भारतात सध्या २१ उच्च न्यायालये आहेत.उच्च न्यायालयातील कामाचा व्याप, राज्याचे क्षेत्रफळ व लोकसंख्या विचारात घेऊन उच्च न्यायालयाची खंडपीठे निर्माण करण्याचा अधिकार संसदेला आहे.उदा.महाराष्ट्रातील मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद, नागपूर आणि पणजी या तीन ठिकाणी खंडपीठे आहेत.

**रचना -** प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपतीला आवश्यक वाटतील तेवढे इतर न्यायाधीश असतात.त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना असला तरी सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश, राज्याचा मुख्य न्यायाधीश आणि संबंधित राज्याचा राज्यपालाचा सल्ला घ्यावा असे घटनात्मक बंधन आहे.

**पात्रता -** उच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमण्यासाठी पुढील पात्रता घटनेत दिलेल्या आहेत.

१) तो भारतीय नागरिक असावा.
२) भारतातील कोणत्याही न्यायालयात १० वर्ष न्यायाधीश पदाचा अनुभव असावा.
३) उच्च न्यायालयात १० वर्ष वकिलीचा अनुभव असावा.
४) राष्ट्रपतीच्या मते तो सुप्रसिद्ध कायदेपंडित असावा.

**कार्यकाल व वेतन -** उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना वयाच्या ६२ वर्षापर्यंत पदावर राहता येते.नवीन दुरूस्तीनुसार वयाच्या ६५ वर्षापर्यत पदावर राहता येते.त्याने गैरप्रकार वा घटनाभंग केल्यास महाभियोगाच्या माध्यमातून त्यांला पदावरून दूर करता येते.मुख्य न्यायाधीशाला ९० हजार रुपये तर इतर न्यायाधीशांना ८० हजार रुपये इतके मासिक वेतन असते.वेतनाशिवाय निवृत्ती वेतन, सरकारी निवासस्थान व वाहन, आरोग्य भत्ता आणि इतर भत्ते मिळतात.निवृत्तीनंतर ज्या न्यायालयात काम केले ते न्यायालय सोडून इतर न्यायालयात वा सर्वोच्च न्यायालयात वकिली करता येते.

**अधिकार व कार्य -** उच्च न्यायालयाला घटनेने पुढील अधिकार दिलेले आहेत.

**१) प्रादेशिक अधिकार -** ज्या घटकराज्यात उच्च न्यायालय असते. त्या राज्याच्या कार्यक्षेत्रापुरता उच्च न्यायालयाचा अधिकार मर्यादित असतो.त्याच राज्यातील खटले उच्च न्यायालयात दाखल करता येतात.उदा.महाराष्ट्रातील उच्च न्यायालयात महाराष्ट्रातील खटले दाखल करता येतात परंतु संसदेला कायदा करून

उच्च न्यायालयाचे क्षेत्र वाढविता येते.उदा.महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाच्या क्षेत्रात गोवा राज्याचा समावेश केलेला आहे.

**२) प्रारंभिक अधिकार क्षेत्र -** जे खटले कनिष्ठ न्यायालयात दाखल न करता सरळ उच्च न्यायालयात दाखल करता येतात.त्या खटल्यांचा समावेश प्रारंभिक अधिकार क्षेत्रात केला जातो.यात पुढील खटल्याचा समावेश होता.

अ) मूलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी असलेले खटले प्रथम उच्च न्यायालयात दाखल करता येतात.कारण मूलभूत अधिकारावर अतिक्रमण झाल्यास बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश सारखे आदेश काढण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे.

ब) लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषद निवडणुकाबाबतचे वाद प्रथम या न्यायालयात दाखल करावे लागतात.

क) राज्य कायदेमंडळाच्या घटनात्मक वैधतेबाबतचा आणि घटस्फोट, विवाह, मृत्यूपत्र व न्यायालयीन अवमान बाबतचे खटले उच्च न्यायालयात प्रथम दाखल करता येतात.

**३) पुनर्निर्णयाचा अधिकार -** उच्च न्यायालया हे घटकराज्याचे सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे.राज्यातील दुय्यम न्यायालयानी दिलेल्या निर्णयाविरूद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते.दिवाणी आणि फौजदारी दोन्ही खटले अपिलासाठी योग्य मानले जातात.दुय्यम न्यायालयाने आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा दिलेली असेल तर हा खटला पुनर्विचारासाठी उच्च न्यायालयात पाठविला जातो कारण उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा देता येत नाही.तसेच घटनेच्या अर्थाबद्दल किंवा कायदयाच्या अधिक चिकित्सेचा प्रश्न खटल्यात असेल तर असा दिवाणी दावा उच्च न्यायालयात पुनर्निर्णयासाठी येतो.

४) **अभिलेख न्यायालय -** उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय आहे.तेथे चालणाऱ्या कामकाजाची लेखी नोंद घेतली जाते.कारण भावी काळात त्या नोंदीचा पुरावा म्हणून वापर केला जातो.तसेच न्यायालयीन अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे.

५) **दुय्यम न्यायालयावर देखरेख व नियंत्रण -** राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयावर देखरेख ठेवण्याचा अधिकार उच्च न्यायालयांना आहे.कनिष्ठ न्यायालयाने कोणत्या प्रकारचे कार्य करावे याबाबत न्यायालय नियम तयार करू शकते.कनिष्ठ न्यायालयांनी आपली कागदपत्रे कशी ठेवावी याबाबत मार्गदर्शन करू शकतात.तसेच कनिष्ठ न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या, रजा, नेमणुका आणि सेवाशर्तीबाबत उच्च न्यायालय नियम तयार करत असतात.

**न्यायालयीन पुनर्विलोकन वा पुनरावलोकन -**

न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाने केलेला कायदा घटनाबाहय असल्यामुळे तो रद्द ठरविण्याची न्यायालयाला असलेली सत्ता होय.ज्या देशात राज्यघटनेचे सार्वभौमत्व मान्य केलेले असते त्या देशात न्यायालयाना हा अधिकार दिलेला असतो.उदा.अमेरिकेतील न्यायालयाना हा अधिकार दिलेला आहे.या अधिकारामुळे कायदेमंडळाना घटनेच्या मर्यादेत राहून कायदे करावे लागतात.कारण कायदेमंडळाने केलेल्या कायदयापेक्षा घटना श्रेष्ठ आहे.अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सर जॉन मार्शल यांनी दिलेल्या निकालामुळे न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार न्यायालयाना मिळाला.भारतात सर्वोच्च न्यायालयाला मर्यादित प्रमाणात न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे.कारण न्यायालयाना फक्त कायदा करण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे पाहवयाचे असते.घटनेने संसदेवर टाकलेल्या मर्यादेच्या अधिन राहून कायदा केलेला असेल तर तो रद्द करता येत नाही.मर्यादाबाहेर जाऊन कायदा केलेला असेल तर तो रद्द करता येतो.अमेरिकेच्या न्यायालयापेक्षा भारतीय न्यायालयाना मर्यादित प्रमाणात हा अधिकार दिलेला आहे.तसेच संसदेने वेळावेळी घटनादुरूस्त्या करून हा अधिकार मर्यादित केलेला आहे.पहिल्या घटनादुरूस्तीने घटनेत नववे परिशिष्ट समाविष्ट केले.या परिशिष्टातील कायदे न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेतून वगळयात आले.गोलकनाथ खटल्यांचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने १३ व्या कलमाचा आधार घेऊन मूलभूत हक्कांत संसदेला बदल करता येणार नाही.हा निकाल दिला.या निकालाविरूद्ध संसदेने २४ वी घटनादुरूस्ती करून १३ व्या कलमात काहीही म्हटले असले तरी घटनादुरूस्तीच्या ३६८ व्या कलमाला ते लागू नाही हा बदल केला.केशवानंद भारती खटल्याचा निकाल

देतांना न्यायालयाने संसदेला घटनादुरूस्ती करून घटनेची मूलभूत चौकट बदलता येणार नाही हा निकाल दिला.या निकालावर मात करण्यासाठी संसदेने ४२ व्या घटनादुरूस्ती करून घटनादुरूस्तीच्या ३६८ व्या कलमानुसार घटनेच्या कोणत्याही भागात बदल करता येईल ही दुरूस्ती केली.

अशाप्रकारे संसदेने वेळावेळी घटनादुरूस्त्या करून न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार मर्यादित केलेला दिसतो.

**प्र.३ रा.न्यायालयीन सक्रियता व्याख्या, स्वरूप, विकास आणि गुणदोष स्पष्ट करा?**

भारताच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय उपलब्ध करून देण्याची जबाबदारी घटनेने शासनावर टाकलेली आहे.भारतात सामाजिक न्याय प्रस्तापित करणे हा घटनाकारांचा मुख्य उद्देश होता.आणि तो पूर्ण करण्यासाठी भारतात निपक्षपाती व स्वतंत्र न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आणि त्यांच्याकडे मूलभूत हक्क संरक्षणाची जबाबदारी देण्यात आली.

**न्यायालयीन सक्रियता व्याख्या, अर्थ व स्वरूप -** सामान्यतः ज्या प्रश्नावर धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार कायदेमंडळ व कार्यकारी मंडळांना असतो मात्र त्या प्रश्नावर न्यायालयानी निर्णय देणे म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय. न्यायालयीन सक्रियता जनहित याचिका आणि न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न न्यायालय करतांना दिसतात.न्यायालय फक्त कायदयाचा अर्थ लावत नसून कायदा कसा करावा याबाबत सूचना देऊ लागले परिणामतः कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात संघर्ष होऊ लागला.

**न्यायालयीन सक्रियतेचा विकास -** सामाजिक न्यायाची पूर्तता करण्यासाठी न्यायालयांनी सार्वजनिक हिताला प्राधान्य देण्यास सुरूवात केली.१९७० च्या दशकानंतर काटेकोर नियम बाजुला ठेवून सामाजिक कार्यक्रम व संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिका स्वीकारून न्यायालयानी सक्रियता दाखविण्यास सुरूवात केली.कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे नागरिक मोठया प्रमाणावर जनहित याचिका दाखल करू लागले.१९८० च्या दशकात मोठया प्रमाणावर जनहित याचिका दाखल होऊ लागल्या.परिणामतः न्यायालयानी न्यायालयीन सक्रियतेचा वापर करून आपल्या अधिकार क्षेत्रात मोठया प्रमाणावर वाढ करून घेतली.तसेच राजकारणात अनिष्ट प्रवृत्ती शिरल्यामुळे सर्वसामान्य जनतेला शासनाकडून न्याय मिळेनासा झाला.त्यामुळे जनतेला न्याय उपलब्ध करून देण्यासाठी आणि राजकारणातील अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी न्यायालयांनी सक्रिय होऊन स्वतः खटले दाखल करून निर्णय दयायला सुरूवात केली त्यामुळे आधुनिक काळात न्यायालयाचे महत्त्व वाढले.

**न्यायालयीन सक्रियतेचे मूल्यमापन आणि गुणदोष-** न्यायालयीन सक्रियतेचे पुढील गुण दिसून येतात.

**१)** न्यायालयीन सक्रियता घटनेतील उच्च लोकशाही मूल्यांना प्रत्यक्ष व्यवहारात आणत आहे.व्यक्तीचे स्वातंत्र्य कायदयाच्या वरवंटयाखाली चिरडले जाऊ नये म्हणून घटनेने दिलेल्या सामाजिक न्यायाची हमी न्यायालयीन सक्रियतेतून वास्तवात येत आहे.

**२)** नागरी स्वातंत्र्य हे घटनेचे मुख्य तत्त्व आहे.स्वार्थी राजकारणाच्या हुकूमशाही कायदयापासून मानवी हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायालय सक्रिय होऊ लागले.त्यासाठी न्यायालयानी कायदेमंडळाच्या विरोधात निकाल देण्यास सुरूवात केली.

**३)** कायदेमंडळाने योग्य कायदे केले असते.कार्यकारी मंडळाने व्यवस्थित कायदयाची अंमलबजावणी केली असती तर न्यायालयाना सक्रिय होण्याची गरज राहिली नसती पण दोन्ही विभागांनी योग्य काम न केल्यामुळे न्यायालयानी पुढाकार घेऊन कायदा अंमलबजावणी जबाबदारी घेतली ते योग्य केले .

**न्यायालयीन सक्रियचे दोष-** न्यायालयीन सक्रियतेचे दोष पुढिल प्रमाणे होत

**१)** न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायालय कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या कामकाजात अवाजवी हस्तक्षेप करीत आहे.उदा. घटनेतील तरतूदीचा मर्यादाबाहेर जाऊन अर्थ लावणे.

**२)** घटनेने न्यायालयावर कायदयाचा अर्थ लावण्याची जबाबदारी सोपविली आहे.पण या पलीकडे जाऊन न्यायालयानी कायदे व कार्यकारी मंडळाचे अधिकार आपल्याकडे घेतल्यामुळे घटनेतील अधिकार विभागणी तत्त्वांचा भंग झाला.

**३)** समाजकल्याणासाठी न्यायालयानी न्यायालयीन सक्रियतेचा वापर करावा पण कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाना त्यांच्या क्षेत्रात काम करू द्यावे.न्यायालयानी मर्यादा ओलाडू नये कारण न्यायमंडळ आणि कायदेमंडळाच्या कामात अत्यंत पुसट रेषा आहे.त्याचा आदर न्यायालयानी करावा.

अशा प्रकारे न्यायालयीन सक्रियेतचे गुणदोष आहेत.म्हणून या तत्त्वांचा वापर न्यायालय आणि न्यायाधीशानी करावा ही अपेक्षा सद्यःकाळात व्यक्त केली जाते.

**जनहित याचिका-**

सामान्यतः ज्या प्रश्नावर धोरणात्मक निर्णय कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाने पुढाकार घ्यावा ही अपेक्षा असते पण त्या प्रश्नांवर न्यायालयाने निर्णयाने स्वतःहून पुढाकार घेऊन निर्णय देणे वा तक्रारदार व्यक्तीऐवजी कोणत्याही व्यक्तींनी सार्वजनिक हितासाठी दाद मागतिल्यावर न्यायालयाने निर्णय देणे इत्यादींचा जनहित याचिका संकल्पनेत समावेश होता.जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायालये कायदयाचा अर्थ न लावता कायदा कसा करावा याच्या सूचना सरकारला देऊ लागले आहे.सामाजिक हित आणि समाजकल्याणासाठी १९७० पासून न्यायालयांनी काटेकोर नियम आणि गुंतागुंतीच्या कार्यपद्धतीचा त्याग करून सामाजिक जाणिवा असलेल्या संघटनांनी गोरगरिब नागरिकांच्या वतीने दाखल केलेल्या याचिका दाखल करून जनहित याचिका दाखल करून घेण्यास सुरूवात केली.

**जनहित याचिकेचा अर्थ व स्वरूप-** "जनहित याचिका म्हणजे जनतेचे हितसंबंध जोपासण्यासाठी व वैधानिक हक्कांची कोणाकडून पायमल्ली होत असेल तर त्याचा अटकाव करण्यासाठी न्यायालयात दाद मागणे होय."

भारतीय कायदयात सार्वजनिक हिताच्या रक्षणासाठी खटले दाखल करण्याची तरतूद आहे.या तरतूदीचा वापर जनहित याचिका दाखल करण्यास सुरूवात केली.जनहित याचिकेद्वारा सामान्य माणूस न्यायालयात दाद मागू शकतो.यामुळे सामान्य नागरिकांच्या हक्कांना सुरक्षिततेची हमी प्राप्त झाली आहे.या याचिकेत जनतेचे हितसंबंध गुंतलेले पाहिजे.याचिकाकर्त्यांचे वैयक्ति हितसंबंध असता कामा नये.या याचिका सर्वसाधारण खटल्यापेक्षा भिन्न असतात.या याचिकेत पिडीत व्यक्तीला दावा दाखल करण्याची गरज नसते.कोणताही नागरिक वा संस्था सार्वजनिक हितासाठी पिडीत व्यक्तीच्या वतीने याचिका दाखल करू शकते.या याचिकामुळे सामाजिक संस्था व नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी अनेक याचिका दाखल करून मानवी हक्कांचे संरक्षण केलेले आहे.

आज जनहित याचिका सर्वत्र प्रचलित झालेली असली तरी सुरूवातीच्या काळात न्यायव्यवस्थेत तिला स्थान नव्हते.राजनैतिक आणि न्यायालयीन कारणातून तिचा हळूहळू विकास झाला.१९७० च्या दशकात जनहित याचिकांना सुरूवात झाली.१९८० च्या दशकात जनहित याचिकाचे महत्त्व वाढू लागले.सद्यःपरिस्थितीत या याचिकांना उधाण आलेले आहे.जनहित याचिकेचा प्रथम वापर हुसैन आरा खातून विरूद्ध बिहार सरकार खटल्यातून झालेला आहे.दि इंडियन एक्सप्रेस वर्तमानपत्रात बिहार तरूगांतील कैदयांना दिल्या जाणाऱ्या अमानवी वागणूक आणि बेकायदेशीर अटकेबाबत प्रसिद्ध बातमीचा आधार घेऊन न्यायालयाने जनहित याचिका दाखल करून निकाल दिला.या निकालामुळे ४०००० हजार कैदयांना सरकारने मुक्त केले.

जनहित याचिकामुळे वंचित समाजघटकांच्या मानवी आणि इतर हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या सरकारी प्रवृत्तीला आळा बसला.कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अकार्यक्षमतेला न्यायालयीन निर्णयामुळे चाप बसण्यास सुरूवात झाली.दैनंदिन जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही सरकारची प्रारंभिक जबाबदारी असल्याचे न्यायालयाने शासनाच्या निर्दशनात आणून दिल्यामुळे ही संकल्पना जनतेत लवकर लोकप्रिय झाली.परिणामतः नागरिक हक्क रक्षण,अन्यायनिवारणासाठी सरकारऐवजी न्यायालयाकडे जाऊ लागली.या तत्त्वाचा आधार घेऊन न्यायालयाने मोठया प्रमाणावर आपल्या अधिकारात वाढ घडवून आणल्याने शासन आणि न्यायालये यांच्यात संघर्ष,वादविवाद सुरू झाले.

**जनहित याचिकेच्या मर्यादा-**

जनहित याचिकेच्या सुरूवातीच्या काळापासून तिच्या गैरवापराबाबत आशंका व्यक्त केलेल्या दिसून येतात.याचिकेद्वारे दाखल केलेल्या खटल्याच्या निकालाबाबतही नागरिकांमध्ये शंका व्यक्त होऊ लागल्या.स्वतः न्यायालयानी निकाल देताना ही भीती व्यक्त केली की,जनहित याचिकावर योग्य नियंत्रण ठेवले नाही किंवा यांचा

होणारा दुरूपयोग थांबविला नाही तर या अधिकाराचा काही लोक आपल्या वैयक्तिक व राजकीय लाभासाठी उपयोग करू शकतात.सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश के.जी.बालकृष्णन यांनी २००८ मध्ये सिंगापूर लॉ अकादमीत भाषण करतांना जनहित याचिकेची सामाजिक न्याय व हितासाठी आवश्यकता मान्य केली.परंतु न्यायालये या तत्त्वाचा वापर करून मनमानीपणे निकाल देतात ही खंत व्यक्त केली.शासनाच्या धोरणविषयक अधिकारात न्यायालये हस्तक्षेप करत असल्याने या तत्त्वामुळे न्यायालये आणि शासन यात संघर्ष निर्माण झाल्याचे मत मांडले.न्यायाधीश वस्तुस्थितीचा विचार न करता निकाल देत असल्याने त्यांचे पालन वा अंमलबजावणी करणे सरकारला शक्य होत नाही.तसेच शासनाच्या कार्यात या तत्त्वांमुळे हस्तक्षेप होत असल्याने शासनाच्या विविध अंगातील शक्ती संतुलन वा सत्ता विभाजन तत्त्वांचा ऱ्हास वा भंग होत असल्याचे निरीक्षण नोंदविलेले आहे.जनहित खाचिकेमुळे दाखल होणाऱ्या खटल्यांची संख्या बेसुमार वाढल्याने न्यायालयावर कामाचा ताण वाढलेला दिसतो.याचिकेच्या माध्यमातून न्यायालयांनी आपले अधिकार वाढवून घेतल्याने सरकारशी संघर्ष करण्याची प्रसंग उद्भलेला दिसतो.या याचिकेच्या दिलेले निकाल योग्य की अयोग्य यांचे परीक्षण करणारी कोणतीही व्यवस्था सद्यः काळात उपलब्ध नसल्याने या तत्त्वांचा जपून वापर करावा हा सल्ला ही दिलेला दिसतो.

जनहित याचिकेच्या तत्त्वांवर वरील टीका केली जात असली तरी सार्वजनिक हितासाठी ही तरतूद आजपर्यंत उपयुक्त ठरलेली दिसते.न्यायालयांनी जनहित याचिकेवर नियंत्रण, गैरप्रकाराला पायबंद, सत्ताविभाजन तत्त्वांला धक्का पोहचणार नाही या पद्धतीने वापर केल्यास हे तत्त्व भारतीयांना न्याय उपलब्ध करून देणारे नवे प्रभावी साधन ठरेल.

**लोकपाल-**

भ्रष्टाचार ही प्रशासनातील प्रमुख समस्या आहे.ही समस्या नष्ट करण्यासाठी विविध देशांनी अनेक प्रयत्न केलेले दिसतात.सर्वप्रथम १८०९ मध्ये स्वीडन देशाने भ्रष्ट्राचाराला पायबंद बसविण्यासाठी अम्बुडस्मन या पदाची स्थापना केली.त्यानंतर जगातील विविध देशांनी ही व्यवस्था स्वीकारली.भारतात अम्बुडस्मनला लोकपाल नावाने ओळखले जाते.१९६६ मध्ये प्रथमच प्रशासकीय सुधारणा आयोगाने अम्बुडस्मन सदृश लोकपाल संस्था भारतात निर्माण करण्याची शिफारस केली.भारतात सर्वप्रथम १९७१ मध्ये लोकपाल विधेयक संसदे मांडले गेले पण मंजूर झाले नाही.त्यानंतर १९७७,१९८५ आणि आजपर्यंत ९ वेळा संसदेत मांडले गेले परंतु आजपर्यंत मंजूर झालेले नाही.

लोकपाल हा मध्यवर्ती प्रशासनातील गैरप्रकाराची चौकशी करणारा अधिकारी आहे.लोकपाल ही संस्था उच्च सरकारी पदावरील भ्रष्टाचार वा गैरप्रकाराच्या दखल घेण्यासाठी आणि कार्यवाही करणारे पद आहे.आजपर्यंत संसदे सादर लोकपाल बिलानुसार त्यांची नियुक्ती राष्ट्रपतीकडून पंतप्रधान, विरोध पक्ष नेता, सरन्यायाधीश, राज्यसभा व लोकसभा अध्यक्षाशी सल्लामसलत करून घ्यावयाचा असतो.त्यांना वेतन आणि पदाची शाश्वती दिलेली आहे.लोकपालचा कार्यकाल पाच वर्ष असतो.त्यांची दर्जा, वेतन, स्थान सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असते.लोकपालला सरकारच्या मान्यतेने स्वतःचा कर्मचारी वर्ग निवडता येतो.संसदेने दोन-तृतीयांश बहुमताने ठराव संमत केल्याशिवाय पदावरून दूर करता येणार नाही.लोकपालला तपासकार्यात मतद करणारी यंत्रणा असेल.दिवाणी न्यायालयाप्रमाणे समन्स काढणे, दस्तऐवज तपासणे, दस्तऐवजाचा शोध घेणे, शपथपत्रावर पुरावे प्राप्त करणे, साक्षीदार तपासणे इ. अधिकार आहेत.लोकपालकडे दाखल तक्रार खरी आढळल्यास तो चौकशी करून आपले निष्कर्ष संबंधित प्राधिकरणाला कळवितो.संबंधित प्राधिकरणाने कोणती कृती केली याविषयी लोकपालला तीन महिन्याच्या आत लोकपालला सादर करावा लागतो.अनावश्यक वा खोटया तक्रारी दाखल करणाऱ्यांना दंड करण्याचा वा अनामत रक्कम ठेवण्याची सक्ती करण्याचा अधिकार आहे.कायदयानुसार लोकपालला आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल राष्ट्रपतीला सादर करावा लागतो आणि राष्ट्रपती तो अहवाल संसदेत सादर करतात.

लोकपाल विधेयक मंजुरीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी संसदेवर मोर्चा आणि दिल्ली या ठिकाणी आमरण उपोषण करून सरकारवर प्रचंड दडपण आणले होते.त्यांनी लोकपाल विधेयक पंतप्रधान, सर्व केंद्रीय मंत्री, संसद संसद, न्यायापालिका, केंद्रीय गुन्हा अन्वेषण,वर्ग १ ते ३ मधील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांची

तक्रार दाखल करण्याचा, चौकशी करण्याचा आणि शिक्षा जाहीर करण्याचा अधिकार असलेली शक्तीशाली लोकपाल संस्था निर्मितीचा आग्रह धरला.परिणामतः सरकार आणि अण्णा हजारे यांच्यात मतभेद निर्माण झाले.लोकभावनेचा आदर करून सरकारने हे बिल संसदे मांडले परंतु आजपर्यंत ते मंजूर होऊ शकले नाही.लोकपाल विधेयक मंजूर झालेले नसले तरी अनेक राज्यशासनांनी लोकायुक्त कायदे संमत करून लोकायुक्ताच्या नेमणुका केलेल्या दिसतात.लोकपाल बिलाबाबत राजकीय पक्ष, समाजसेवक, स्वयंसेवी संस्था यांच्यात कितीही मतभेद असले तरी विविध देशातील अम्बुडस्मन संस्थाचा अभ्यास करून भारतीय राज्यघटना आणि परिस्थितीच्या आधारावर लोकपालच्या कक्षेत विविध पदे, संस्था, विभाग आणि व्यक्तीचा समावेश करावा.कारण भ्रष्टाचाराची समस्या रोखण्यासाठी आणि राजकीय व प्रशासकीय पदाधिकारी, सनदी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी लोकपाल संस्थेची भारताला गरज आहे.

**अपेक्षित वस्तुनिष्ठ आणि एका वाक्यातील प्रश्नोत्तरे.**

१. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाचे निवृत्तीचे वय सांगा .
   उत्तर - सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश वयाच्या ६५ वर्षानंतर निवृत्त होतात.
२. उच्च न्यायालयातील न्यायाधीशाचे निवृत्तीचे वय सांगा .
   उत्तर - उच्च न्यायालयातील न्यायाधीश वयाच्या ६५ वर्षानंतर निवृत्त होतात.
३. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती कोण करतो ?
   उत्तर - सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाची नियुक्ती राष्ट्रपती करत असतो.
४. महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाची खंडपीठे किती व कोठे आहेत?
   उत्तर - महाराष्ट्रात मुंबई उच्च न्यायालयाची औरंगाबाद, नागपूर व पणजी येथे तीन खंडपीठे आहेत.
५. भारतातील सर्वोच्च न्यायालयात किती सरन्यायाधीश व न्यायाधीश असतात?
   उत्तर - भारतातील सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधीश व २७ न्यायाधीश आहेत.
६. भारताचे सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्राचे उच्च न्यायालय कोणत्या शहरात आहेत?
   उत्तर - सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे तर उच्च न्यायालय मुंबई येथे आहे.
७. न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे काय?
   उत्तर- न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाने केलेला कायदा घटनाबाहय असल्यामुळे तो रद्द ठरविण्याची न्यायालयाला असलेली सत्ता होय.ज्या देशात राज्यघटनेचे सार्वभौमत्व मान्य केलेले असते त्या देशात न्यायालयाना हा अधिकार दिलेला असतो.
८. न्यायालयीन सक्रियता म्हणजे काय?
   उत्तर-सामान्यतः ज्या प्रश्नावर धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार कायदेमंडळ व कार्यकारी मंडळांना असतो मात्र त्या प्रश्नावर न्यायालयानी निर्णय देणे म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय.
९. जनहित याचिकेचा अर्थ सांगा.
   उत्तर- जनहित याचिका म्हणजे जनतेचे हितसंबंध जोपासण्यासाठी व वैधानिक हक्कांची कोणाकडून पायमल्ली होत असेल तर त्याचा अटकाव करण्यासाठी न्यायालयात दाद मागणे होय.
१०. अम्बुडस्मनला सदृश भारतातील संस्था कोणती ते सांगा.
   उत्तर- अम्बुडस्मन सदृश भारतातील संस्था लोकपाल होय.
११. लोकपाल बिलानुसार लोकपालचा कार्यकाल किती असतो.
   उत्तर- लोकपालचा कार्यकाल पाच वर्ष इतका असतो.
१२. लोकपालची नियुक्ती कोण करतो.
   उत्तर- लोकपालची नियुक्ती राष्ट्रपती पंतप्रधान, विरोध पक्ष नेता, सरन्यायाधीश, राज्यसभा व लोकसभा अध्यक्षाशी सल्लामसलत करून करत असतो.

## प्रकरण ४ थे
## भारतातील नागरी सेवा

**प्र.१ रा. नागरी सेवा अर्थ व महत्त्व आणि वैशिष्टये आणि कार्य स्पष्ट करा?**

नागरी सेवा हा शब्द लष्करी व पोलिस सेवा शब्दावरून रूढ झालेला आहे.नागरी सेवेला सनदी सेवा असेही म्हणतात.

**१) फायनरच्या मते -** नागरी सेवा म्हणजे व्यावसायिक प्रशासकिय नोकरवर्ग की जो कायमस्वरूपी, पगारी आणि कुशल असतो.

**२) ऑगच्या मते-** सरकारी कार्य करण्यासाठी केवळ मंत्री, सचिव नियुक्त करून चालत नाही तर त्यांच्या बरोबर वरिष्ठ नोकरवर्ग नियुक्त करून चालत नाही.तर त्यांच्याबरोबर कनिष्ठ नोकरवर्ग नियुक्त करावा लागतो.शासनाच्या ध्येय धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारा नोकर वर्ग म्हणजे सनदी सेवा होय.

**नागरी सेवेची वैशिष्टये-** सामान्यतः प्रत्येक देशात नागरी सेवा आढळून येतात.राज्याची प्रशासकीय यंत्रणा चालविण्यासाठी सनदी सेवकांची नियुक्ती केलेली असते.नागरी सेवेची काही वैशिष्टये सांगता येतात.

**१) व्यावसायिकता -** व्यावसायिकता हे नागरी सेवेचे अत्यंत महत्त्वपूर्ण वैशिष्टये होय.नागरीसेवेतील प्रशासक हा व्यावसायिक प्रशासक असतो.प्रशासनात केवळ एकाच प्रकारचा व्यवसाय नसून त्यात विविध व्यवसायाचा समावेश होतो.राज्याला विविध कार्य पार पाडावी लागतात.त्यामुळे नागरी सेवेत विविध वर्ग व श्रेणी पाडलेल्या दिसतात.उदा.प्रशासकीय अधिकारी वर्ग, लेखनिक वर्ग लोकप्रशासन यशस्वी करण्यासाठी व्यावसायिक वर्ग आवश्यक असतात.त्यासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्ग पद्धती निर्माण केलेली असते.

**२) अधिकार श्रेणी पद्धती -** सेवक प्रशासनात अधिकार श्रेणी पद्धत या परंपरागत तत्वांचा स्वीकार करून विविध वर्ग पाडले जातात.कनिष्ठ- वरिष्ठ सेवक अशी वर्गवारी असते.संघटनेत कनिष्ठ सेवक हा वरिष्ठ सेवकात जबाबदार राहून कार्य करतो.प्रशासनात नियंत्रण व मार्गदर्शन ही प्रशासकीय तत्वे वापरून संघटनेची रचना श्रेणी पद्धतीने केली जाते.प्रशासक वरिष्ठ प्रशासकास जबाबदार राहून आज्ञांचे पालन करतो.तसेच कनिष्ठ सेवकांना आदेश देऊन त्याच्या कार्यावर नियंत्रण ठेवतो.प्रत्येक सेवकांची कार्य व अधिकार ठरवून दिलेली असतात.

**३) कायम स्वरूपी सेवा -** नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांना नोकरीची शाश्वती देण्यासाठी त्यांची सेवा कायमस्वरूपी करावी लागते.त्यासाठी त्यांना नोकरीची शाश्वती दयावी लागते.सेवकांना कायमस्वरूपी केल्यामुळे त्यांच्या ज्ञान व अनुभवाचा फायदा होतो.कारण प्रशासनातील राजकीय प्रमुख मंत्री ठराविक काळानंतर बदलत असतात.सनदी सेवक कायमस्वरूपी असल्यामुळे प्रशासन कार्यात सातत्य व स्थैर्य राहते.सेवकांना कामाविषयी गोडी निर्माण झाल्यामुळे प्रशासनात कार्य यशस्वी होते.

**४) कायदेमंडळाला जबाबदार नसतात-** नागरी सेवेतील प्रशासकीय वर्ग कायदेमंडळाला जबाबदार राहत नाही.संघटनेतील कनिष्ठ सेवक वरिष्ठ अधिकाऱ्याला जबाबदार असतो.एखादया खात्यातील प्रशासकीय अधिकाऱ्याकडून चूक झाल्यास संबंधित खात्याचा मंत्री जबाबदार राहतो.कायदेमंडळाच्या प्रश्नाला मंत्री उत्तर देतो.मंत्री आपल्या खात्यातील सनदी सेवकावर नियंत्रण ठेवतो.सेवक मंत्र्याना जबाबदार राहून कार्य करतो.

**५) निपक्षपातीपणा,तटस्थतता व अनामिकता -** नागरी सेवेतील कर्मचारी कोणत्याची राजकीय पक्षाचे सदस्य नसतात.राजकारणापासून अलिप्त राहून निष्पक्षपातीपणे सनदी सेवक कार्य करीत असतात.कोणत्याही गटाच्या हितासाठी कार्य करीत नाहीत.ग्लॅडनच्या मते "सनदी सेवक हा प्रशासनात तटस्थ व कुशल व्यावसायिक असतो.कोणत्याही गट वा पक्षाचा फायदा न पाहता राष्ट्रसेवेला वाहून घेतो.सेवक तटस्थपणे सेवा करून प्रशासनाचा दर्जा टिकवून ठेवतात " वैयक्तिक आवडीनिवडी, कल, पूर्वग्रह, बाजूला ठेवून तसेच सत्ताधारी वा इतर असा भेदभाव न करता सर्वांना कायदयाच्या आधार समान वागणूक देत असतो.

**नागरी सेवेची कार्य -** राज्याचे प्रशासन चालविण्यासाठी सेवक प्रशासनाची व्यवस्था केली आहे.राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक वा विशाल झाल्यामुळे सनदी सेवकांचे कार्य वाढलेले आहे.नागरी सेवेची पुढील कार्य सांगता येतात.

**१) उपदेश व सल्ला देणे -** नागरी सेवेतील वरिष्ठ अधिकारी राजकीय प्रमुखाना सल्ला देतात.विशेषतः राज्याची योजना व ध्येय धोरण निर्माण करतांना सेवकांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त असते.त्यामुळे मंत्री आपल्या खात्याच्या सचिवाचा सल्ला घेतात, त्यांच्या ज्ञान व अनुभवाचा फायदा मंत्र्यांना मिळतो.मंत्री नेहमी बदलत असतात.त्यामुळे अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मंत्र्यांना उपयुक्त ठरते.

**२) अंमलबजावणी करणे -** शासनाने मंजूर केलेली ध्येय धोरणे आणि कायदयाची अंमलबजावणी नागरी सेवेकडून होते.शासनाच्या विविध खात्यातील सनदी सेवकांकडून अंमलबजावणीचे कार्य चालते.कायदेमंडळाचे मंजूर केलेले कायदे कार्यवाही नागरी सेवेकडून होते उदा.अर्थमंत्री अर्थसचिवाकडून माहिती गोळा करून अर्थसंकल्प तयार करतो.

**३) प्रदत्त विधीनियम करणे-** आधुनिक काळात कायदेमंडळाचे कार्य अधिक व्यापक झाले त्यामुळे कायदेमंडळ सर्वसाधारण कायदा करते. त्यात तपशीलवार नियम-उपनियम निर्माण करण्याचे कार्य नागरी सेवेतील अधिकाऱ्यांकडून केले जाते.कारण कायदेमंडळात कायदयाचा सांगाडा तयार होत असतो.कायदयाच्या अंमलबजावणीसाठी नियम-उपनियम आवश्यक असतात.ते करण्याचा अधिकार वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला जातो.प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रदत्त अधिनियमाचा अधिकार दिल्यामुळे प्रशासन कार्य सुलभ होते.

**४) प्रशासकीय न्याय देणे -**आधुनिक काळात तंत्रज्ञान आणि कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे प्रशासनात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात.त्या समस्या सोडविण्यासाठी व जनतेला न्याय देण्यासाठी प्रशासकीय कायदे व न्यायाच्या तरतूदी केलेल्या आहेत.भारतातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशासकीय न्यायदानाचा अधिकार दिला आहे.प्रशासकीय संघटनेमुळे एखादया व्यक्तीवर अन्याय झाल्यास ती व्यक्ती प्रशासकीय न्यायालयात दाद मागू शकते.वरिष्ठ अधिकाऱ्यांना न्यायदानाचा अधिकार दिल्यामुळे शासनाची सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील ध्येय धोरणे यशस्वी होऊ शकतात.

**५) लोककल्याणकारी कार्य करणे-** शासनाची ध्येय धोरणे व कार्य लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी असतात.आधुनिक लोकशाही राज्यात नागरी सेवकाकडून कल्याणकारी कार्य केली जातात.अन्न, वीज, संरक्षण इ.स्वरूपाच्या दैनंदिन सेवा करण्याचे कार्य देखील सनदी सेवक करीत असतात.

**६) जनतेच्या अडचणी सोडविणे -** राज्यातील जनतेचे प्रश्न समजावून त्याविषयी माहिती मंत्र्याकडे पाठविणे आणि त्या संबंधी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे सनदी सेवेचे काम असते.शासकीय ध्येय धोरणे व योजनाची माहिती जनतेला समजावून देणे.त्यामुळे सनदी सेवकाला जबाबदार राहून कार्य करावे लागते.कारण जनतेच्या सहकार्याशिवाय नागरी सेवेचे कार्य पूर्ण होत नाही.

**भारतीय सनदी सेवा आणि राज्यघटना-**

नागरी सेवा, मुलकी सेवा, सनदी नोकर किंवा सरकारी कर्मचारी असे शब्द नेहमी व्यवहारात वापरले जातात.मूळ इंग्रजी Civil Service या शब्दासाठी रूढ मराठी प्रतिशब्द आहे.ब्रिटिशांच्या काळात हा शब्द रूढ झाला.सनदी सेवा हा शब्द ईस्ट इंडिया कंपनीतील जे सेवक वर्ग व्यापारी कामात गुंतलेले होते त्यांचा निर्देश करण्यासाठी प्रथम वापरण्यात आला.१७७३ च्या रेग्युलेटिग कायदयाने कंपनीच्या नागरी आणि व्यापारविषयक कार्यात फरक केल्यामुळे सनदी सेवेच्या विकासाला चालना मिळाली.ब्रिटन मध्ये या शब्दाची सर्वसाधारण व्याख्या करतांना राजकीय अथवा न्यायालयीन अधिकारी वगळून नागरी क्षेत्रात कार्य करणाऱ्या आणि संसदेने मान्यता दिलेल्या पैशातून आपले वेतन घेणाऱ्या नोकराचा सनदी म्हणून उल्लेख केला जातो.ब्रिटिशांनी भारतात सनदी सेवेची सुरूवात केली.ब्रिटिशांनी १८६१ मध्ये भारतीय मुलकी सेवा कायदा संमत करून भारतीयांना मोठया प्रमाणात सनदी सेवेत प्रवेश दिला.स्पर्धा परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढविली.१९१९ च्या कायदयापर्यंत शासन आणि प्रशासन यांचे सनदी सेवेत एकत्रीकरण झालेले होते.१९१९ आणि १९३५ कायदयान्वये

लोकनियुक्त मंत्र्यांने धोरण आखणे आणि सनदी सेवकांनी अंमलबजावणी करणे असे विभाजन झाले.१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्याने मोठया प्रमाणावर ब्रिटिश सनदी अधिकारी मायदेशी परत गेल्याने तज्ञ प्रशासकांची गरज पूर्ण करण्यासाठी नवी भारतीय प्रशासकीय सेवा संघटित करण्याचा निर्णय झाला.त्यासाठी भारतीय राज्यघटनेने कलम ३०८ ते ३२३ कलमांमध्ये सनदी सेवाबाबत तरतूदी करून या सेवांना घटनात्मक दर्जा दिलेला आहे.घटनेत सनदी सेवेबाबत पुढील तरतूदी आहेत.

१. केंद्रीय पातळीवर लोकसेवा आयोगाची स्थापना करणे आणि तशाच प्रकारचे आयोग प्रत्येक राज्यासाठी स्थापन करणे.
२. अखिल भारतीय सेवा स्थापन करणे.
३. कार्यकालाची सुरक्षितता प्रदान करण्यासाठी कोणत्याही सनदी सेवकांची नेमणूक ज्या प्राधिकाराने केली आहे,त्यापेक्षा दुय्यम प्राधिकाराकडून पदच्युत केले जाणार नाही.प्रत्येक सनदी सेवकांला आपल्या विरूद्ध होणाऱ्या कारवाईबाबत आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल.त्या शिवाय त्यास पदमुक्त वा पदावनती केली जाणार नाही ही तरतूद करून सेवा शाश्वती देण्यात आली.
४. सनदी सेवकांना जलद न्याय मिळवून देण्यासाठी किंवा त्यांच्या वरील खटल्यांचा निपटारा करण्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना करण्याची तरतूद (१९७६ च्या कायदयाने) मध्ये करण्यात आली.

**प्र. २ ला. सनदी सेवक भरती पद्धती स्पष्ट करा?**

सनदी सेवेत कर्मचाऱ्यांची भरती हे अत्यंत महत्त्वाचे कार्य मानले जाते.कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर प्रशासनाची कार्यक्षमता व यश अवलंबून असते.संपूर्ण प्रशासनाची रचना व कार्य नियुक्त केल्या जाणाऱ्या सनदी सेवकांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.प्राचीन काळात अभिजन वर्गातून सनदी सेवकांची भरती केली जात असे.

**सनदी सेवक भरतीच्या पद्धती-** सनदी सेवकांच्या भरतीबाबत दोन पद्धती अस्तित्वात होत्या.त्या पुढील प्रमाणे

**१. मलिदा वा लूट पद्धत-**अमेरिकेत पुर्वी मलिदा वा लुट पद्धतीने सनदी सेवकांची भरती केली जात असे.या पद्धतीत सार्वत्रिक निवडणुकीत जो राजकीय पक्ष बहुमत मिळवून सत्तारूढ होत असे.या सत्तारूढ पक्षाला आपल्या मर्जीप्रमाणे सनदी नोकरांच्या नेमणुका करता येतात.सत्तारूढ पक्ष पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना बडतर्फ करून नवीन कर्मचारी नियुक्त करतो.या प्रकारच्या भरतीला लूट पद्धत असे म्हणतात.मलिदा पद्धतीत सदोष असल्यामुळे १८८३ ला बंद करण्यात आली.कारण या पद्धतीत गुणापेक्षा दोष जास्त होते.निवडणुकीत विजयी होणाऱ्या पक्षाच्या मर्जीवर सेवकांची नियुक्ती अवलंबून असल्याने प्रशासकीय अधिकारी वारंवार बदलू लागले परिणामतः प्रशासनात अस्थैर्य निर्माण झाले.अपात्र सेवकांची भरती, सत्तेचा गैरप्रकार, भ्रष्टाचार इ.दोष निर्माण झाल्यामुळे लुट पद्धत नष्ट झाली.

**२. गुणवत्ता पद्धत -** जेव्हा नोकरवर्गाची नेमणूक विशेष पात्रतेच्या आधारावर केली जाते त्यांला गुणवत्ता पद्धत असे म्हणतात.लूट पद्धतीतील दोषामुळे उमेदवाराची पात्रता वा योग्यतेच्या आधारावर भरती करणे हे गुणवत्ता पद्धतीचे प्रमुख वैशिष्टये आहे.२० व्या शतकात बहुतेक देशात या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे.या पद्धतीत प्रत्येक व्यक्ती परिक्षेत बसण्याची समानसंधी, बढती संधी आणि नोकरीची शाश्वती दिली जाते.या पद्धतीमुळे कार्यक्षम नोकर वर्ग नेमला जातो.प्रशासनाचा दर्जा उंचावून शासनाला स्थैर्य व पावित्र्य लाभते.नागरी सेवेत तटस्थता, कार्यक्षमता वा सातत्य कायम ठेवण्यासाठी ही पद्धत आवश्यक उपयुक्त ठरते.

साधारणतःवरील दोन मार्गाने जगातील विविध देशात भरती केली जात असे.

**प्र.३ रा.भारतातील सेवक भरती पद्धती स्पष्ट करा?**

भारतात सनदी सेवकांच्या भरतीच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष या दोन पद्धतीने भरती प्रक्रिया राबविली जाते.

१. **प्रत्यक्ष भरती वा गुणवत्ता पद्धतीने भरती-** या पद्धतीद्वारा नागरी सेवेतील रिक्त पदे प्रत्यक्ष भरतीच्या मार्गाने गुणवत्ता तत्त्वांचा अवलंब करून भरली जातात.स्पर्धा परीक्षा घेऊन उमेदवारांची पात्रता निश्चित केली जाते.विशिष्ट वयाची अट आणि विद्यापीठाची पदवी ही किमान पात्रता मानली जाते.योग्य पात्रता वा अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना सनदी सेवेत नियुक्त केली जाते.प्रत्यक्ष भरती निवड क्षेत्र व्यापक उपलब्ध होते.सर्वांना समान संधी आणि हुशार व्यक्तींची नेमणूक, तरूण कर्मचाऱ्याची नेमणूक या मार्गाने केली जात असल्याने ही पद्धत लोकशाही व न्यायावर आधारित आहे.परंतु अनुनभवी व्यक्तीची नेमणूक, अनुभवी सेवकांचा तरूण वरिष्ठ अधिकारीमुळे प्रशासनात द्वेष,अकार्यक्षमता हे दोष निर्माण होतात.हे दोष टाळण्यासाठी अप्रत्यक्ष पद्धतीचा मर्यादित प्रमाणात वापर केला जातो.

२. **अप्रत्यक्ष पद्धती वा बढती पद्धतीने भरती-** या पद्धतीद्वारा नागरी सेवेतील रिक्त पद असेल त्याच विभागातील कनिष्ट सेवकाला सेवा ज्येष्ठता, कार्यक्षमता वा अंतर्गत स्पर्धा परीक्षाद्वारा कनिष्ठ सेवकांला बढती देऊन उच्च पदावर नियुक्त केले जाते त्या पद्धतीला बढती वा अप्रत्यक्ष भरती पद्धत म्हणतात.या पद्धतीमुळे कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा फायदा प्रशासनाला मिळतो.वरिष्ठ पदावरील नियुक्तीच्या अपेक्षेने कर्मचारी कार्यक्षम व उत्साहीपणे काम करतील.त्यांना प्रशिक्षणाची गरज राहणार नाही.हे गुण असले तरी या पद्धतीमुळे निवडीचे क्षेत्र मर्यादित होते.संघटनेबाहेरील व्यक्तींची नेमणूक करावी लागते.तरूणांची वरिष्ठ पदावर नेमणूक करता येत नाही.म्हणून या पद्धतीत दोष आढळून येतात.

नागरी सेवेतील कर्मचाऱ्याच्या भरतीच्या दोन्ही पद्धतीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की दोन्ही पद्धतीत गुण-दोष आहेत.म्हणून नागरी सेवेत कर्मचाऱ्याची भरती करतांना भारतीय सनदी सेवेत दोन्ही पद्धतीचा वापर केला जातो.प्रत्यक्ष भरतीतील गुणवत्ता आणि अप्रत्यक्ष भरतीतील बढती पद्धतीद्वारा प्रशासनातील रिकामी पदे भरली जातात.त्यामुळे प्रशासनात समतोल निर्माण होऊन प्रशासनाला स्थैर्य व यश लाभते.

**भारतीय सेवक भरती प्रक्रिया वा टप्पे-**

भारतीय प्रशासनातील सेवकांची भरती करण्यासाठी केंद्र पातळीवर संघ लोकसेवा आयोग आणि प्रत्येक राज्यात वा दोन-तीन राज्य मिळून एक राज्य सेवा आयोगामार्फत सनदी सेवकांची भरती केली जाते.हे आयोग साधारणतः सेवक भरतीसाठी पुढील प्रक्रियाचा अवलंब करत असतात.प्रशासनातील सनदी सेवकांच्या रिक्त वा नव्याने निर्माण झालेल्या जागासाठी संघ वा राज्य आयोगामार्फत देशभरातील प्रसिद्धी माध्यमात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविले जातात.विशिष्ट वयाची अट, नागरिकत्व, विद्यापीठाची पदवी इत्यादी पात्रता सनदी सेवकांसाठी निश्चित केलेल्या आहेत.

**अ)स्पर्धा परीक्षा-** सनदी सेवकांची भरतीत पात्र वा गुणवत्तावान सेवकांची निवड करण्यासाठी स्पर्धा परीक्षा संघ वा राज्य आयोगाकडून आयोजित केल्या जातात.स्पर्धा परीक्षा दोन प्रकारच्या असतात.खुल्या स्पर्धा परीक्षेत संघटनेबाहेरील वा देशभरातील कोणताही पात्र उमदेवार परीक्षा देऊ शकतो याउलट बंदिस्त वा मर्यादित परीक्षेत संघटनेत कार्य करणारा वा विशिष्ट काळ सेवा केलेल्या आणि सेवाचा अनुभव असलेल्या व्यक्तीला परीक्षेला बसता येते.परीक्षेचे स्वरूप पुढील प्रमाणे असते.

१. **पूर्व परीक्षा-** पूर्व परीक्षा ही चाळणी स्वरूपाची परीक्षा मानली जाते.कारण सनदी सेवक पदासाठी देशभरातून अनेक उमेदवार अर्ज करत असतात.त्यातून लायक, पात्र वा गुणवान उमेदवारांना निवडण्यासाठी या परीक्षेचा वापर केला जातो.या परीक्षेत साधारणतः बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात.विशिष्ट गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना लेखी परीक्षेस बसण्याची संधी दिली जाते.

२. **लेखी वा मुख्य परीक्षा-** सनदी सेवकांची पात्रता निश्चित करण्यासाठी लेखी परीक्षा घेतली जाते.लेखी परीक्षेमुळे बौद्धिक पात्रता व क्षमता समजून येत असते.लॉर्ड मॅकाले यांनी लेखी परीक्षेचा पुरस्कार केला आहे.उमेदवार सामान्य कि विशेष ज्ञानाचा आहे हे लेखी परीक्षेवरून समजते.लेखी परीक्षा घेतांना प्रश्नाचे स्वरूप कसे असावे.या परीक्षेत निबंधवजा आणि लधुत्तरी स्वरूपाचे प्रश्न विचारले जातात.या परीक्षेच्या माध्यमातून उमेदवारांची भाषिक कौशल्य, आकलन क्षमता, लेखन कौशल्य, सामान्य ज्ञान, तर्कक्षमता, ज्ञानाची खोली इत्यादी गुणांची पारख केली जाते.मुख्य परीक्षेत बसलेल्या उमेदवारांमधुन एकूण रिक्त पदाच्या विचार करून प्राप्त गुणाचा कोटा वा पात्र उमेदवारांची संख्या निश्चित केली जाते.मुख्य परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीला बोलविले जाते.

३. **मुलाखत वा तोंडी परीक्षा-** सनदी सेवेत पात्रता ठरविण्यासाठी लेखी परीक्षेसोबत तोंडी परीक्षा घेतली जाते.मुलाखतीतून उमेदवाराची कार्यक्षमता व प्रसंगावधान, त्वरीत निर्णयक्षमता इ.गोष्टीची योग्यता समजते.उमेदवारांची योग्यता जाणून घेण्यासाठी तोंडी परीक्षा आवश्यक मानली जाते.मुलाखतीतून उमेदवाराची भाषा, बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व इ.गोष्टी समजून येतात.

४. **प्रात्यक्षिक परीक्षा-** प्रात्यक्षिकांचा वापर करून तांत्रिक सेवेतील सनदी सेवकांची पदे भरली जातात.उदा.इंजिनियर, मॅकॅनिक्स, टायपिस्ट उमेदवारांच्या तांत्रिक ज्ञानाविषयी प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन त्याचे तांत्रिक कौशल्ये पाहिली जातात.केवळ तांत्रिक ज्ञानाची प्रमाणपत्रे न पाहता प्रत्यक्ष वा तांत्रिक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे उपयुक्त असते.उदा.उमेदवाराची टायपिंगतील गती व वेग पाहण्यासाठी थोडा मजकुर टाईप करण्यासाठी दिला जातो.

५. **शारीरिक परीक्षा-** सनदी सेवेतील काही पदाची भरती करतांना शारीरिक परीक्षा घेतली जाते.बौद्धिक पात्रतेबरोबर शारीरिक पात्रता असणे महत्वाचे असते.उमेदवार बौद्धिक व शारीरिक दृष्टया समर्थ असेल तर प्रशासन कार्य यशस्वी करू शकतो.लेखी व तोंडी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराची वैद्यकिय तपासणी केली जाते.वैद्यकिय परीक्षाद्वारे उमेदवाराची शारीरिक क्षमता तपासली जाते.शारीरिक परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय नेमणूक दिली जात नाही. हा शारीरिक परीक्षाचा एक प्रकार मानला जातो.याशिवाय ज्या पदासाठी बौद्धिक क्षमतेसोबत शारीरिक क्षमतेची गरज असते.ती पदे भरण्यासाठी शारीरिक परीक्षा घेतली जाते.उदा.सैन्यदल क्षेत्रात रिकामी पदे भरतांना उमेदवाराची शारीरिक परीक्षा घेतली जाते.

अशा प्रकारे सनदी सेवकांची नियुक्ती करण्यासाठी वरील प्रक्रियाचा भारतात वापर केला जातो.पूर्वपरीक्षेतील गुणांचा अपवाद वगळता लेखी परीक्षा आणि मुलाखत, शारीरिक वा प्रात्यक्षिक परीक्षातील गुणाचा विचार करून अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करून पात्र उमेदवारांची सनदी सेवक पदी नेमणूक केली जाते.नेमणुकीनंतर येणाऱ्या योग्यरीतीने पार पाडण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते.प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कायमस्वरूपी नेमणूक दिली जाते.या पद्धतीने भारतातील सेवक भरती प्रक्रिया कार्य करत असते

**प्र.३ रा.भारतीय वा संघ लोकसेवा आयोगांची रचना, कार्य आणि अधिकार स्पष्ट करा?**

(Union Public Service Commission in India)

राज्य प्रशासनाचा दर्जा कायम राखण्यासाठी योग्य व कार्यक्षम सेवकांचा भरती आवश्यक असते.घटनेच्या कलम ३१५ ते ३२३ नुसार भारतीय संघराज्यासाठी एक केंद्रीय लोकसेवा आयोग तर प्रत्येक घटकराज्याकरिता राज्यसेवा आयोग तर दोन वा दोनापेक्षा अधिक राज्याकरिता संयुक्त लोकसेवा आयोग निर्माण करण्याची शिफारस केली.संसदेने कायदा करून वरील आयोग निर्माण केले आहेत.स्वातंत्र्यपूर्व काळातील आयोगाच्या शिफारशीनुसार भारतात लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.१९३५ च्या कायदयाने लोकसेवा आयोगाच्या अधिकारात वाढ करण्यात आली.१९५० ला सांघिक लोकसेवा आयोगाचे नांव बदलून केंद्रीय लोकसेवा आयोग असे नांव देण्यात आले.

**केंद्रीय लोकसेवा आयोग रचना-** केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व इतर सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करत असतो.सदस्य किती असावी याबाबत राष्ट्रपती निर्णय घेत असतो.सदस्य संख्या साधारणतः ८ ते १० पर्यंत असते.आयोगातील निम्मे सदस्य केंद्र वा राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली १० वर्ष नोकरीचा अनुभव असलेले असतात.कारण अनुभवी व हूशार सदस्य नेमणूकीमुळे योग्य व पात्र सेवकांची भरती करता येते.

**कार्यकाल -** आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल ६ वर्ष इतका असतो.वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत पदावर राहता येते.सदस्य मुदतीपूर्वी पदाचा राजिनामा देऊ शकतो.सदस्यांने गैरवर्तन, अयोग्य वर्तन, भ्रष्टाचार, लाभाचे पद स्वीकारल्यास वा दुसरी पगारी नोकरी स्वीकारल्यास वा न्यायालयाने दिवाळखोर घोषित केल्यास राष्ट्रपती चौकशी करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयास देतो.न्यायालयाने दोषी ठरविल्यास राष्ट्रपती त्याला बडतर्फ करतो.आयोगाच्या सदस्याना सेवानिवृत्तीनंतर सरकारी नोकरी करता येत नाही.

**वेतन व भत्ते-** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपती असतो.त्याचे वेतन संचित निधीतून दिले जाते.अध्यक्षाला ९० हजार तर इतर सदस्यांना ८० हजार दरमहा वेतन दिले जाते.

**लोकसेवा आयोग अधिकार व कार्य -** आयोगाचे अधिकार व कार्य पुढील प्रमाणे सांगता येतात.

१) केंद्र सरकारच्या सेवात करावयाच्या नेमणुकीसंबंधी जाहिरात प्रसिद्ध करणे, उमेदवाराचे अर्ज मागवून छाननी करणे, उमेदवाराची लेखी व तोंडी परीक्षा घेणे, निकाल जाहीर करणे, खातेनिहाय जागांची नियुक्ती करणे.

२) दोन किंवा अधिक राज्यांनी विनंती केल्यास त्या राज्यांना संयुक्त सेवा भरतीच्या योजना तयार करण्यास वा राबविण्यास मदत करणे.

३) सनदी सेवकाच्या भरती, नेमणूका, बढती, बदली, सेवाशर्ती इत्यादींबाबतची तत्त्वे वा पद्धती निश्चित करणे वा त्याबाबत राष्ट्रपतीला सल्ला देणे.सनदी सेवकाचा भत्ता व निवृत्ती वेतनाबाबत निर्णय घेतांना लोकसेवा आयोगाचा सल्ला घेतला जातो.

४) केंद्रीय लोकसेवा आयोगाला आपल्या कामाचा वार्षिक अहवाल राष्ट्रपतीकडे पाठवावा लागतो.राष्ट्रपती तो अहवाल संसदेत ठेवतो.

५) राज्य लोकसेवा आयोग व संयुक्त लोकसेवा आयोगाना मार्गदर्शन करणे.

वरील कार्याशिवाय संसद कायदा करून आयोगाकडे अधिक जबाबदाऱ्या व कार्य सोपवू शकते.

**लोकसेवा आयोग महत्त्व -** केंद्रीय लोकसेवा आयोग शासनाला सल्ला आणि शिफारस करणारी महत्त्वाची संस्था आहे.प्रशासनात कुशलता, कार्यक्षमता आणि सुलभता निर्माण करण्यासाठी कुशल सेवक वर्ग आवश्यक असतो.प्रशासनात विविध खाती व पदे असतात.या पदावर योग्य पात्रतेच्या व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी आयोग उपयुक्त संस्था आहे.आयोग राजकीय प्रभावापासून स्वातंत्र्य आहे.आयोग सदस्याना नोकरीची शाश्वती देण्यात आली आहे.

**प्र.४ था.महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची रचना, कार्य आणि अधिकार स्पष्ट करा?**

(Maharastra Public Service Commission)

घटनेच्या ३१५ व्या कलमानुसार घटकराज्यासाठी राज्य लोकसेवा आयोग स्थापन करण्याची तरतूद आहे.राज्य आयोगाची रचना केंद्रीय आयोगाप्रमाणेच आहे.

**राज्य आयोग रचना -** राज्य आयोगाचा एक अध्यक्ष व इतर सदस्य असतात.त्यांची नियुक्ती राज्यपाल करतो.आयोगाची सदस्य संख्या राज्यपाल निश्चित करतो.महाराष्ट्र राज्य आयोगात एक अध्यक्ष व पाच सदस्य आहेत.आयोगातील निम्मे सदस्यांना केंद्र आणि राज्य प्रशासनात नोकरीचा कमीत कमी १० वर्षाचा अनुभव असला पाहिजे.

**कार्यकाल-** आयोग सदस्याचा कार्यकाल ६ वर्ष इतका असतो.सदस्याला ६२ वर्षापर्यंत आपल्या पदावर राहता येते.

**बडतर्फ वा पदच्युती -** आयोग सदस्य मुदतीपर्वी पदाचा राजिनामा देऊ शकतो.सदस्याने गैरवर्तन केल्यास वा कोर्टाने दिवाळखोर ठरविल्यास त्याने लाभाचे पद स्वीकारल्यास राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन सदस्यास बडतर्फ करू करतो.सभासदाची नेमणूक राज्यपालाकडून केली जाते पण पदच्युती राष्ट्रपतीकडून केली जाते.आयोग सदस्य निवृत्तीनंतर केंद्रीय आयोगाचा सदस्य व अध्यक्ष होऊ शकतो.परंतु त्याला केंद्र व राज्यात सरकारी नोकरी करता येत नाही.

**वेतन-** राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व सदस्यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्यपालांना आहे.त्याचे वेतन संचित निधीतून दिले जाते.आयोग अध्यक्षाला ८० हजार तर ७० सदस्यास हजार वेतन दरमहा मिळते.

**राज्य लोकसेवा अधिकार व कार्य-** घटनेच्या ३२० कलमात राज्यसेवा आयोगाचे अधिकार पुढील प्रमाणे आहे.

१) राज्य सरकारच्या सेवात करावयाच्या नेमणुकीसंबंधी जाहिरात प्रसिद्ध करणे, उमेदवाराचे अर्ज मागवून छाननी करणे, उमेदवाराची लेखी व तोंडी परीक्षा घेणे, निकाल जाहीर करणे, खातेनिहाय जागांची नियुक्ती करणे.

२) सनदी सेवा पदाच्या भरतीबाबत कोणत्या पद्धती स्वीकाराव्यात.सनदी सेवेच्या नेमणूका, बढती, बदली बाबत कोणती तत्वे स्वीकारावीत याबाबत राज्यपालाना सल्ला देणे.सनदी सेवकांच्या शिस्तीबाबत नियम ठरविण्याचा अधिकार आयोगाला आहे.सनदी सेवकाचा भत्ता व निवृत्ती वेतनाबाबत निर्णय घेतांना लोकसेवा आयोगाचा सल्ला घेतला जातो.

३) राज्य लोकसेवा आयोगाला आपल्या कामाचा वार्षिक अहवाल राज्यपालाकडे पाठवावा लागतो.राज्यपाल तो अहवाल विधानसभेत ठेवतो.

४) राज्यपालाने सनदी सेवेबाबत विचारलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत सल्ला देणे.

५) राज्यात होणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची व्यवस्था करणे.

६) राज्य सेवेतील व स्थानिक सेवेतील कमचाऱ्यांच्या विभागीय परीक्षांची व्यवस्था करणे, राज्यापालांनी आदेश दिल्यास राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील नोकरांची निवड करणे.

७) लोकसेवा आयोग सेवक भरती करणारी सर्वश्रेष्ठ यंत्रणा असल्याने सनदी सेवा संरक्षण संबंधित न्यायालयीन कार्य ही आयोगाला पार पाडावे लागते.

वरील महत्त्वपूर्ण कार्य व जबाबदाऱ्या आयोगाला पार पाडाव्या लागतात.

**स्टाफ सिलेक्शन कमिशन -** (Staff Seletion Commission)

संघ लोकसेवा आयोगाकडे वर्ग १ व २ सनदी सेवकांची भरती करण्याची जबाबदारी असते.१९७५ पर्यंत तृतीय श्रेणीच्या केंद्रीय कर्मचाऱ्याच्या भरतीसाठी कोणतेही सरकारी अभिकरण वा यंत्रणा अस्तित्वात नव्हती.४ नोव्हेंबर १९७५ ला केंद्र सरकारने स्टाफ सेवा आयोगाची स्थापना केली नंतर त्याचे नांव स्टाफ सिलेक्शन आयोग हे बदलले.हा आयोग केंद्र शासनाच्या सचिवालय, संलग्न कार्यालये आणि अधिनस्थ कार्यालयात गैरतांत्रिक तृतीय श्रेणीच्या पदाच्या कर्मचाऱ्याची भरती करतो.अर्थात भारत सरकारच्या लिपिक कर्मचाऱ्यांची भरती करत असतो.मात्र रेल्वे, महालेखापरीक्षक आणि औद्योगिक प्रतिष्ठानांना भरती आयोगाच्या कक्षेतून वगळलेले आहे.कमिशन तृतीय श्रेणीच्या पदासाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करतो.

**रचना -** आयोगात एक अध्यक्ष आणि दोन सदस्य आणि एक सचिव असतो.सचिव हा परीक्षा नियंत्रक असतो.आयोगातील सर्व सदस्यांची नियुक्ती केंद्र शासनाकडून केली जाते.आयोग स्थापना आदेशात कार्यकालाचा उल्लेख नाही.आयोग सदस्याचा कार्यकाल कार्यकारी मंडळाच्या इच्छेवर अवलंबून

असतो.वर्तमान आयोगाचा अध्यक्ष लोकसेवा आयोग सदस्य आणि शासनाच्या अतिरिक्त सचिवपदावर कार्यरत आहे.आयोगाची स्थिती प्रशासकीय सुधार विभागाच्या संलग्न कार्यालयासारखी आहे.

**आयोगाचे अधिकार व कार्य -**

१) केंद्र शासनातील कनिष्ठ श्रेणीतील लिपिकाची भरती करण्यासाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करणे.

२) केंद्रीय सचिवालयातील तृतीय श्रेणी सेवा वर्ग लिपिक तृतीय श्रेणीच्या भरतीसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करणे

३) केंद्रीय सचिवालयातील लिपिक श्रेणीतील जागा चतुर्थ वर्गातून तृतीय वर्गात पदोन्नतीसाठी परीक्षेचे आयोजन करणे.

४) हिंदी आणि इंग्रजी टंकलेखन परीक्षेचे आयोजन करणे.

५) केंद्र सरकारच्या सेवामध्ये करावयाच्या नेमणुकासंबंधी जाहिरात देणे, उमेदवारांचे अर्ज मागवून त्यांची छाननी करणे, त्यांची लेखी व तोंडी परीक्षा घेणे, निकाल जाहीर करणे आणि खातेनिहाय जागांची नियुक्ती करणे.

स्टाफ सिलेक्शन तृतीय श्रेणीच्या पदासाठी स्पर्धा परीक्षा घेऊन उमेदवाराची भरती करत असतो.आयोगाच्या शिफारशीच्या आधारावर केंद्र सरकार कर्मचाऱ्यांना नियुक्ती देत असते.त्यामुळे आयोगाचे कार्य सनदी सेवेच्या भरतीबाबत महत्त्वपूर्ण मानले जाते.

**अपेक्षित वस्तुनिष्ठ आणि एका वाक्यातील प्रश्नोत्तरे.**

१. सनदे सेवेचा अर्थ स्पष्ट करा?
उत्तर- नागरी सेवा म्हणजे व्यावसायिक प्रशासकिय नोकरवर्ग की जो कायमस्वरूपी, पगारी आणि कुशल असतो.

२. नागरी सेवेची दोन वैशिष्टये सांगा.
उत्तर- व्यावसायिकता, अधिकार श्रेणी पद्धती, राजकीय तटस्थता, कायमस्वरूपी सेवा ही वैशिष्टये आहेत.

३. सनदी सेवेची दोन कार्य सांगा.
उत्तर- उपदेश व सल्ला देणे, अंमलबजावणी करणे, प्रदत्त विधीनियम करणे, प्रशासकीय न्याय देणे ही सनदी सेवेची कार्य आहेत.

४. सनदी सेवकांच्या भरतीच्या दोन प्रमुख पद्धती सांगा.
उत्तर- मलिदा वा लूट पद्धत आणि गुणवत्ता पद्धत या सनदी सेवक भरतीच्या दोन पद्धती आढळतात.

५. भारतातील सनदी सेवकांच्या भरतीच्या प्रमुख पद्धती सांगा.
उत्तर- भारतात सनदी सेवकांच्या गुणवत्ता पद्धत आणि बढती पद्धत या दोन पद्धतीद्वारा भरती केली जाते.

६. संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक कोण करतो.
उत्तर- संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक राष्ट्रपतीकडून करत असतो.

७. संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्य कार्यकाल किती वर्षाचा असतो.
उत्तर- संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल सहा वर्षाचा असतो.

८. संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांना वयाच्या कितव्या वर्षापर्यत पदावर राहता येते.
उत्तर- संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांना वयाच्या ६५ वर्षापर्यत पदावर राहता येते.

९. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती कोण करतो.
उत्तर- महाराष्ट्र लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राज्यपाल करत असतो.

१०. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्याला कोण बडतर्फ करू शकतो.
उत्तर- महाराष्ट्र लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्याला राष्ट्रपती बडतर्फ करू शकतो.

११. स्टाफ सिलेक्शन कमिशन कोणत्या प्रवर्गातील सनदी सेवकांची भरती करतो.
उत्तर- स्टाफ सिलेक्शन कमिशन वर्ग-३ वा तृतीय श्रेणीच्या सनदी सेवकांच्या भरतीचे कार्य करतो.

१२. स्टाफ सिलेक्शन कमिशनची स्थापना कधी झाली ते सांगा.
उत्तर- ४ नोव्हेंबर १९७५ ला केंद्र सरकारने स्टाफ सेवा आयोगाची स्थापना केली नंतर त्याचे नांव स्टाफ सिलेक्शन आयोग हे बदलले